

श्री साईलीला
वर्ष ३१ वें
१०
अंक ४ था.

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

**श्री. नागेश आत्माराम सावंत**

व्यवस्थापक

**श्री. रामचंद्र महादेव राणे**

## श्रीसाईलीला मासिकासंबंधीं

१ श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात, तरी पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अंकाची वाट पहावी. तोंपर्यंत अंक न पोचल्यास लगेच आम्हांला कळवावें. अंक शिल्लक असल्यास अगत्यपूर्वक पुन्हां पाठविला जातो. मात्र अंक शिल्लक नसल्यास त्यासंबंधीं वेगळा पत्रव्यवहार केला जात नाहीं.

२ वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां येतें.

३ मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.

४ वर्गणी मनिऑर्डरनें 'व्यवस्थापक, श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५, बॅंक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १, या पत्त्यावर पाठवावी.

५ या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.

व्यवस्थापक.

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखक | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | | ७ |
| २ | प्रिय वाचक | संपादक | ८ |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | ११ |
| ४ | 'श्रीसाई' नामाचा चमत्कार | | १५ |
| ५ | वामन पंडित आणि श्रीज्ञानेश्वरी | वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर | १७ |
| ६ | पंथराज : योगाभ्यासाचा राजमार्ग | ना. वा. गुणाजी | २४ |
| ७ | बाबांच्या पूर्णाकृति प्रतिमेची प्राणप्रतिष्ठा | | ३५ |
| ८ | ज्ञानेश्वरींतील भक्तिमार्ग | ग. ल. रेगे | ४० |
| ९ | महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर | | ४८ |
| १० | श्रीनामदेवाच्या चरित्रांतील कांहीं सुरस प्रसंग | | ५२ |
| ११ | श्रीसाईबाबा संस्थान कमिटीची निवडणूक | | ५८ |
| १२ | शिरडी-वृत्त | | ६० |


# लेखकांसाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

(४) स्वीकृत लेख अंकांत प्रसिद्ध झाल्यावर यथाशक्ति मोबदला देण्यांत येईल.

—संपादक.

# श्री साई लीला



## श्री साई वाक्सुधा

संचित भोगल्याशिवाय संपत नाहीं. खरा उपाय हाच कीं इष्ट-अनिष्ट, सुख–दुःख, अमृत किंवा विष हीं आपल्या संचिताप्रमाणें आलेलीं द्वंद्वें आहेत असा विवेक करून त्यांचा हर्ष किंवा शोक दोन्ही नसावेत. जें जें येईल तें तें सहन करावें. अल्ला मालिक दयाळू आहे. त्याला सर्व काळजी. चित्त–वित्त–काया–वाणीसहित त्याच्या चरणीं शरण जाऊन त्याचें निरंतर स्मरण जो करील त्याला त्याची करणी अनुभवास आल्यावांचून राहाणार नाहीं.

—श्रीसाईसच्चरित–अ. ३४

३१-१२-५४ ऑक्टोबर, नव्हेंबर, डिसेंबर १९५४

# -प्रिय वाचक-

श्री साईलीलेचा चालू वर्षाचा हा अखेरचा अंक वाचकांच्या हातीं देतांना मला थोडेंसें कृतकृत्यतेचें समाधान वाटत आहे हें कबूल केलें पाहिजे. 'लीले'चें संपादन माझ्याकडे आल्यापासून या अंकाबरोबर दोन वर्षें पुरीं होतात. या दोन वर्षांत साईलीला अधिकाधिक वाचनीय आणि संग्राह्य करण्याचा मीं यथाशक्ति यत्न केला, आणि त्याला श्रीसाईकृपेनें बरेंच यशही लाभलें. मला मिळालेल्या सहकार्याबद्दल माझे सहकारी आणि वाचकवर्ग यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. हें नियतकालिक आजच्याहूनही अधिक आकर्षक आणि उद्‌बोधक करण्याची आकांक्षा मीं मनाशीं बाळगली आहे. श्रीसाईंच्या कृपाप्रसादानें आणि सर्वांच्या सहानुभूतिपूर्ण स्नेहशील सहकार्यानें माझा हा मनोदय पुरा होईल असा मला विश्वास वाटतो.

× × ×

श्रीसाईबाबांच्या भक्तीचा प्रसार गणितश्रेढीनें वाढत आहे, तर भक्तजनांची संख्या भूमितिश्रेढीनें वृद्धिंगत होत आहे. यामुळें शिर्डींत श्रीदर्शनाला येणाऱ्या भक्तजनांची रीघहि दिवसेंदिवस वाढती आहे. दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांच्या निवासाची शक्य ती सर्व सोय संस्थान–कमिटीनें केलेली आहे. जास्तींत जास्त चारशें कुटुंबें एकाच वेळीं फारशी गैरसोय न होतां राहूं शकतील इतकी राहण्याची व्यवस्था शिरडीला होऊं शकते. संस्थान–कमिटीनें शक्य तेवढ्या इमारती भक्तांच्या सोयीसाठीं बांधल्या आहेत. भक्तांच्या अधिकाधिक सोयी व्हाव्यात आणि त्यांना श्रीदर्शन सुखानें व निर्वेधपणें घेतां यावें हीच संस्थान–कमिटीची कळकळीची इच्छा आहे. तरीहि गैरसोय क्वचित् प्रसंगीं होते, ती अपरिहार्य आहे असें मानून भक्तांनीं संस्थानच्या व्यवस्थापक–वर्गाशीं सहकार्य करावें अशी मी त्यांना मनःपूर्वक विनंति करतों. भक्तांची अधिक सोय करण्यासाठीं जास्तींत जास्त सवलती कोणत्या प्रकारें उपलब्ध करून देतां येतील हें पाहण्यासाठीं आणि केलेल्या सोयी यथायोग्य रीतीनें सर्वांना मिळतात कीं नाहीं याची दक्षतेनें काळजी घेण्यासाठीं अलीकडेच संस्थान–कमिटीनें एक उपसमिति नेमली आहे. या समितींत पुढीलप्रमाणें सदस्य आहेतः—

(१) श्री. बी. सी. पाटील (रिटा. सिव्हिल जज)
(२) श्री. के. जे. भट
(३) ,, के. एस. सावंत

(४) ,, ठमाजी भिकाजी शेळके पाटील

(५) ,, श्रीपाद बा. देव, ॲडव्होकेट

हे सदस्य असलेली ही समिति आपल्यापरीनें भक्तांसाठीं अधिकांत अधिक सुखसोयी देण्याची पराकाष्ठा करील, अशी माझी निश्चिति आहे.

× × ×

श्रीसाईंची जनमनांत भक्ति वाढली हें पाहतांच या भक्तीचा आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठीं फायदा करून घेणारे लोक अहमहमिकेनें पुढें सरसावेत हें स्वाभाविकच आहे. श्रीसाई भक्तांचें गाऱ्हाणें ऐकतात, त्याचीं संकटें दूर करतात, अशा गोष्टींचा फायदा घेऊन 'हमखास संकट–निवारण' करून देणारे कांहीं तथाकथित 'साईभक्त' आतां लोकांची दिशाभूल करूं लागलेले आढळून येतात. आजारपण कसें घालवावें, नोकरी कशी मिळवावी, वशिला कसा लावावा, पैसे कसे मिळवावे इत्यादि गोष्टींवर रामबाण उपाय सांगूं पाहणाऱ्या कांहीं लोकांनीं आपल्या या संकल्पाची जोराजोरानें टिमकी वाजविण्यास सुरुवात केली आहे. हें सर्व आपत्ति-निवारण साईबाबांच्या नांवानें आणि त्यांच्या उपदेशानुसार चालणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. हा सारा प्रकार अश्लाघ्य आहे हें सांगायला नकोच. भोळ्या भाविकांच्या श्रद्धेला चुचकारून त्यांच्या खिशांतून पैसे काढून आपली तुंबडी भरण्याचा हा उद्योग आहे. साईबाबा संकटनिवारण करतात, पण त्यांना 'श्रद्धा' अथवा निष्ठा ही विकतां येत नाहीं. 'रामबाण,' 'हमखास' इत्यादि शब्द या संदर्भात त्यांच्या कोशांत बसण्यासारखे नाहींत. 'बाबा, मीं इतकी श्रद्धा तुम्हांला दिली, आतां माझें इतकें संकट–निवारण करा' असा श्रद्धेचा व्यापार बाबांबरोबर करतां येण्यासारखा नाहीं. आणि नेमका हाच व्यापार साईभक्तीचा डांगोरा पिटणारे कांहीं धार्मिक वैदू अलीकडे करूं लागले असल्याचें दिसून येत आहे. त्यांच्यापासून लोकांना सावध करणें हें माझें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. अंतःकरणाच्या तळमळीनें बाबांची प्रार्थना केल्यास बाबा पावतात हें खरें आहे. पण हें आणि इतकेंच खरें आहे. बाबांना फक्त तुमच्या चित्ताची श्रद्धा हवी, कळकळीची निष्ठा हवी. ती देऊन आपला सर्व भरिभार खऱ्याखुऱ्या श्रद्धेनें आणि विनीत अंतःकरणानें त्यांच्यावर सोंपवावा, इतकेंच भक्ताला करतां येतें. यापलीकडे बाबांनीं काय करावें हें सांगण्याचा भक्ताचा अधिकार नाहीं. अशा परिस्थितींत 'आम्हांला इतके पैसे दिलेत तर तुम्हांला साईबाबा प्रसन्न कसे होतील याचें रहस्य सांगणारें व नियम वर्णन करणारें पुस्तक आम्ही तुम्हांला पाठवितों.' अशी ग्वाही देणाऱ्या लोकांपासून सावधान ! बाबा पैशानें वश होत नाहींत, विधिविधानांनीं ते गवसण्यासारखे नाहींत, कर्मठपणानें ते सांपडण्यासारखे नाहींत, शिर्डीच्या हजारों यात्रा हृदयशून्य भावानें केल्यात तरी ते तुमच्या आटोक्यांत येण्यासारखे नाहींत. तुमचें संपूर्ण अंतःकरण त्यांच्या चरणीं समर्पण करणें, एवढी एकच गोष्ट काय ती आवश्यक

आहे. भक्तांनीं ही गोष्ट ध्यानांत घ्यावी आणि बाबांच्या नांवावर लुबाडूं पाहणाऱ्या धूर्तांपासून सावध असावें.

× × ×

श्रीसाईंच्या संदेशाचा प्रचार व प्रसार करण्यासाठीं अनेक पुस्तकें अलीकडे प्रसिद्ध होत आहेत व अनेक नियतकालिकें निघत आहेत. त्यासंबंधीं अनेक भक्तांच्या मनांत गैरसमज माजलेले आढळून येतात. यासाठीं स्पष्ट खुलासा करणें अवश्य आहे असें मला वाटतें. भक्तांनीं ही गोष्ट ध्यानीं घ्यावी कीं,

शिरडी संस्थानतर्फे निघणारें **श्रीसाईलीला** त्रैमासिक हेंच काय तें संस्थानचें अधिकृत नियतकालिक आहे. या व्यतिरिक्त निघणाऱ्या इतर कोणत्याहि नियतकालिकाशीं शिर्डी–संस्थान–कमिटीचा कसलाहि संबंध नाहीं.

तसेंच शिर्डी–संस्थान–कमिटीतर्फे प्रसिद्ध होणारीं पुस्तकें हींच काय तीं संस्थानचीं अधिकृत पुस्तकें होत. एरवीं निरनिराळ्या लेखकांनीं व पुस्तक–प्रकाशकांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांशीं संस्थानचा कोणताहि संबंध नाहीं. तरी साईलीलेव्यतिरिक्त इतर नियतकालिकांबाबत आणि संस्थानकमिटीनें प्रकाशित केलेल्या पुस्तकांव्यतिरिक्त इतर कोणत्याहि पुस्तकांबाबत वाचकांनीं साईलीलेच्या संपादकांशीं अथवा संस्थान–कमिटीशीं पत्रव्यवहार करूं नये.

# शिरडी संस्थानचे सभासद व्हा

सर्व साईभक्तांना आमची प्रेमाची विनंती आहे कीं, त्यांनीं शिरडी येथील श्रीसाईबाबा संस्थानचे सभासद होऊन बाबांच्या कार्यांत सहभागी व्हावें.

संस्थानचे आश्रयदाते होणारास रु. ५०० शुल्क<br>
,, आजीव सभासद ,, ,, १०० ,,<br>
,, सामान्य ,, ,, ,, ५ ,, वार्षिक

## सभासदास खालील अधिकार मिळतात

१ रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथीचा प्रसाद घरपोंचता मिळतो.

२ निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा अधिकार असतो, व समितीचा सभासद ह्या नात्यानें उमेदवार म्हणून उभें रहातां येतें.

३ सर्वसाधारण सभेंत हजर राहून संस्थानच्या कारभाराबद्दल सूचना किंवा प्रश्न विचारण्याचा अधिकार प्राप्त होतो.

४ संस्थानचा वार्षिक अहवाल घरपोंचता मिळतो.

'श्रीसाईबाबा संस्थान, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १' ह्या पत्त्यावर दोन आण्यांचा स्टॅम्प पाठविल्यास सभासदाच्या अर्जाचा तक्ता पाठविला जाईल.

—चिटणीस.




संकलकः—**आमचे प्रतिनिधि**

## हें बाबांचेंच आश्वासन

**श्री.** वि. के. छत्रे, जोगळेकरवाडा, सिद्धेश्वर आळी, कल्याण, हे आपला एक अनुभव सांगतांना लिहितातः—

डिसेंबर १९५३ चे थंडीचे दिवस. खोकल्यानें मी अगदीं बेजार झालों होतों. मधूनमधून दमाही त्रास देतच होता. डॉक्टरचीं औषधें, इंजेक्शनें, घरगुती काढे, छाती शेकणें, वगैरे शक्य ते उपाय चालू होते. पण खोकला कांहीं यत्किंचित् हटण्याचें चिन्ह दिसेना.

याच पंधरवड्यांत खोकल्याचें दुःख कमी वाटूनच कीं काय दोन्ही बरगड्यांत कुशीच्या बाजूस दुखूं लागलें. तेव्हां मात्र 'मरण बरें वाटतें' अशी म्हणण्याची माझ्यावर पाळी आली.

सर्वांची निजानिज झाली कीं मी आपला खुर्चीवर मान टेंकून बसत असें. निजण्याची मुळींच सोय नव्हती; कारण पाठ जमिनीला लागली रे लागली कीं क्षणार्धांत खोकल्याची उबळ येऊन उठावें लागे व कफ बाहेर पडतांना दोन्ही फुफ्फुसांतील रक्तवाहिन्या जणूं तटातट तुटताहेत असें वाटून प्राणांतिक वेदना होत. असें वाटे—कोणीतरी छातीचा भाग घट्ट आवळून अगदीं जखडून बांधून टाकील तर बरें.

शिरडीस बाबांचें दर्शन थोड्याच दिवसांपूर्वी घेतल्यावर त्यांच्याविषयीं एक दृढ श्रद्धा निर्माण झाली होती. एका रात्रीं त्यांनाच सर्वभावें शरण जाऊन त्यांचा धांवा करण्यास सुरवात केली. असे १।२ दिवस गेल्यावर एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास कोणी तरी मला मोठ्यानें म्हणाले, 'अरे बसलास कां ? नीज.' कोण बोललें हें न पाहतांच मी म्हणालोंः—'काय म्हणतां ? नीज ! अहो, हा शब्द तर माझ्या कोशांतून गेले १५ दिवस संपूर्ण गेला आहे. पाठ भुईला टेकल्या क्षणाला माझा तो हाडवैरी खोकलोबा मांजराची मानगुट धरावी त्याप्रमाणें धरून उठवील ना !'

'अगदीं भिऊं नकोस. मी हा येथें बसलों आहे. बघतों कसा खोकला येतो तो.' असे धीराचे शब्द कानावर आले.

पंधरा दिवस सारखें बसून पेंगुळलेलें शरीर, त्यानें पडत्या फळाची आज्ञा घेऊन पाठ जमिनीवर टेकली—अगदीं पूर्ण विश्वासानें—सांगणारे कोण याची चिकित्सा न करतां. व मोठेंच आश्चर्य घडलें. केव्हां उजाडलें हें देखील मला कळलें नाहीं. खोकला नाहीं

न विकला नाहीं. आतां सांगा, भाविक वाचकांनो, छातीवर हात ठेवून अशा तऱ्हेनें आश्वासन देणारें श्रीसाईबाबांशिवाय दुसरें कोण असेल ?

त्यानंतर मात्र मला हळूहळू आराम पडत गेला.

× × ×

## 'बाबां' विनाऽऽश्वासयिता क एषः

**श्री.** छत्रे यांनीं आपला वर दिलेला अनुभव संस्कृत श्लोकबद्ध करून पाठविला आहे. तो असाः—

१ देहे कफाधिक्यमभूद् भृशंच
मां जर्जरं कासरिपुश्चकार ।
सुखेन निद्रा न ततोऽर्धमासे
नीता निशास्तास्तु निषीदतैव ॥

२ सुप्तेषु सर्वेषु जनेषु नेया
निशाखिलैवं यदि जागृतेन ।
क्लेशाः कियंतः सम एव रुग्णो
ज्ञातुं समर्थो न परः कदापि ॥

३ स्रावश्चलत्याननना‍सिकाभ्यां
प्राणास्तदा पंच समाकुलास्ते ।
'मातर्हरे राम सुशीघ्रमेही'—
त्याक्रंदतः कोऽस्ति सुहृत् ? स एव ॥

४ क्लेशाः सुसह्या अभवन्निवेमे
जातं ततोऽतर्भम फुफ्फुसेऽपि ।
दुःखं सुतीव्रं यदसह्यमेव
कफस्य तन्निर्गमनप्रयत्ने ॥

५ श्रांतं शरीरं सुचिरं निषीदत्
समुत्सुकं तत्स्वपितुं धरांके ।
पतत्यधो हा ! रुगरिस्तु दुष्ट
उत्थापयत्याशु हठात् क्षणे तद् ॥

६ 'टक् टक्' ध्वनिः कालनिदर्शकस्य
कर्णे समुच्चैः पतति क्षपायाम् ।

स्वस्थं मनश्चेत् स सुहृत्समानो
मनस्य शांते रिपुवत्स एव ॥
७ यथोचितैर्यद्युपचारशस्त्रैः
न रुग्रिपोः किंचिदपि प्रणाशः ।
ध्यानाच्च नामस्मरणाद्विना श्री–
गुरोर्गतिः कास्त्यपरा नराय ॥
८ प्रारब्धवान् प्रार्थयितुं तदानी–
–मनन्यभावेन ततो गुरुं स्वम् ।
तालानुसारेण स्वस्य 'टक् टक्'
नामस्मरन् भक्त–पितुर्दयालोः ।
९ इत्थं व्यतीतेषु दिनेषु मध्य–रात्र्यां वचोऽहं श्रुतवानकस्मात्
श्रांतोऽधुना त्वं स्वपिहीत्यसौ तु वक्ता न कुत्रापि बभूव दृश्यः ॥
१० उत्थापयेन्मां तु पुनः क्षणार्धे रिपुर्ममासौ, स्वपनं कुतो मे?
अहं निषण्णोऽत्र बिभेहि मा त्वं, पपात चाश्वासनमाशु कर्णे ॥
११ विश्वस्य शब्देष्वथ धैर्यदेषु सुप्तोऽहमाश्चर्यमभून्महच्च ।
निद्रासुखं भुक्तमहो ह्यपूर्वं, बाबांविनाऽऽश्वासयिता क एषः ॥

× × ×

## बाबांची ही कृपा

**श्री.** रघुनाथ गोपाळ ओगले, आसि. अकौंटंट, ओगले ग्लास वर्क्स, ओगले वाडी, हे लिहितातः—

माझ्या सासूबाई सौ. अन्नपूर्णाबाई फाटक यांचे पोटाचें ऑपरेशन हुबळीस को–ऑप. हॉस्पिटलमध्यें दिनांक २३ मार्च १९५४ मध्यें झालें. ऑपरेशन मोठें अवघड होतें, व पेशंटचे तब्बेतीचें मान विचारांत घेतां त्या जगणेंही अशक्य होतें. त्यावेळीं माझी बायको सौ. मंगला हिनें महाराजांना नवस केला कीं, ऑपरेशन उत्तम तऱ्हेनें पार पडल्यास आम्हीं सर्व दर्शनास येऊं व तोंपर्यंत भात खाणार नाहीं. असा तिनें नवस केला. महाराजांचे कृपेनें सौ. सासुबाईचें ऑपरेशन उत्तम तऱ्हेनें पार पडलें व आम्हीं दिनांक २५–८–५४ रोजीं श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शनास आलों, व सौ. मंगलानें समाधीस भाताचा नैवेद्य दाखवून नवस फेडला. ही महाराजांचीच लीला.

२. मी स्वतः एका बँकेंत नोकरीस होतों. मी तेथला राजीनामा देऊन १९५० सालीं ओगलेवाडीस नोकरीस आलों. बँकेकडून माझ्या प्राव्हिडंट फंडाची कॉंट्रिब्यूशन येणें होती. पुष्कळ प्रयत्न केले, पण पैसे मिळण्याची आशा अजीबात नव्हती. शेवटीं


रक्कम मिळाल्यास ( ता. २५–८–५४ पूर्वी ) मीं शिर्डीस जाणेचें ठरवलें व महाराजांचे कृपेनें ही रक्कम १६–८–५४ रोजीं मला स्पेशल केस म्हणून बँकेकडून मिळाली. ज्या रकमेविषयीं ४ वर्षें मीं पुष्कळ अर्ज, विनंत्या केल्या पण कांहीं उपयोग झाला नाहीं ती रक्कम श्रीसाईमहाराजांच्या कृपेनें मला सत्वर मिळाली. व आज आम्ही सहकुटुंब दर्शनांस आलों. ही एक श्री साईमहाराजांचीच कृपा.

× × ×

## अपघातांतून आश्चर्यजनक बचाव

श्री शहेरियार फरदुनजी मिस्त्री, जळगांव, हे लिहितातः—

मी व माझे घरांतलि सर्व माणसें बाबांना सर्व मानतात. रोज उदबत्ती, फुलें वगैरे नेमानें वाहतात. मी झालवार ( राजस्थान ) मध्यें मोटार कंपनींत नोकरी करतों. दोन वर्षांपासून मोटार ड्रायव्हिंगचें (माल–ट्रकवर) काम करतों. ह्या २६–१०–५४ रोजीं दिवाळीचे दिवशीं दुपारीं तीन वाजतां मी व क्लीनर मोटार माल भरून छत्रपूर स्टेशनहून झालावारला जायला निघालों. परंतु ४ मैल गेलों नाहीं तोंच माझ्या गाडीचा स्टिअरिंग रॉड निघाला. तें मला कळूत येतांच मीं क्लीनर वर होता त्यास ओरडून सांगितलें कीं, तूं उडी घे, गाडी माझे ताब्यांत नाहीं. त्याप्रमाणें त्यानें उडी घेतली, व मी जोरजोरानें साईनाथ जप करूं लागलों. 'बाबा मला वांचवा' असें आर्तस्वरानें म्हणूं लागलों. तोंच गाडी झाडावर जाऊन आदळली. श्रीबाबांच्या कृपेनें मला कांहीं एक झालें नाहीं. सोबतच्या फोटोवरून कल्पना करतां येईल कीं, ह्यांतून मनुष्य त्यांच्या ( श्री बाबांच्या ) कृपेशिवाय कसा वांचूं शकेल. मला अर्ध्या तासानंतर क्लीनरनें खालीं पडलेल्या मालाखालून ओढून काढलें. ही सर्व श्रीबाबांचीच कृपा समजून आम्हीं येथें समाधीचे दर्शनाला आलों. अशीच त्यांची कृपा सतत आम्हांवर राहो, हीच त्यांचेजवळ प्रार्थना.



★ अपघातांत सांपडलेली मोटार ★

× × ×

# ‘ श्रीसाई ’ नामाचा चमत्कार

श्री ओंकारनाथ स्वामीजी, थोतापल्ली आश्रम, आंध्र, यांनीं ‘ शांति ’ या तेलुगु नियतकालिकांत लिहिलेला एक लेख इंग्रजींत भाषांतर करून श्री. के. एन्. चौधरी यांनीं आमच्याकडे पाठविला होता. त्या लेखांतील कांहीं भागाचा मराठी अनुवाद येथें दिला आहे. आपल्या लेखांत श्री ओंकारनाथ स्वामीजी म्हणतात:—

सध्यां श्रीसाईंची पूजा सबंध देशभर चालू आहे. यंदाच्या वर्षी जन्मोत्सवानिमित्त कांहीं भक्तमंडळी आश्रमांत आली होती. रोजच्या प्रार्थनांच्या कार्यक्रमाबरोबरच दर गुरुवारीं भक्तजन श्रीसाईंचीं भजनें म्हणत असत.

एका दिवशीं मी पूजा–गृहांत गेलों. पूजागृह अतिशय लहान आहे. त्याच्या कोंपऱ्यांत श्रीसाईंची एक तसबीर आहे. मीं लगेच भक्तांना सांगितलें कीं, वरच्या मजल्यावर बांधकाम चालू असलेल्या नव्या प्रशस्त खोलींत श्रीसाईपूजा यापुढें करीत जाऊं. त्याप्रमाणें लगेच व्यवस्था केली, आणि आश्रमांत श्रीसाई–मंदिर तयार झालें.

या श्रीसाई–मंदिरांत श्रीसाईंची स्थापना झाल्यापासून तेथें अनेक चमत्कार आढळून येऊं लागले. त्यांतील कांहीं पुढीलप्रमाणें:—

नैवेद्यासाठीं जेव्हां जेव्हां श्रीसाईंपुढें फळें ठेवण्यांत येत तेव्हां प्रत्येक फळावर ‘ साई ’ अशीं अक्षरें उमटूं लागलीं !

नैवेद्य ठेवल्यानंतर थोड्या वेळानें पहावें तर त्यापैकीं थोडासा भाग कमी झालेला असे.

केळ्यासारख्या फळांवर ‘ साई ’ नाम उमटे. तेव्हां असें मनांत आलें कीं, या मऊ फळांवरचें नांव कायम राहाणार नाहीं. यासाठीं मीं साईंपुढें एकदां लाकडी सफरचंद अर्पण केलें. त्या सफरचंदावर साईनाम उमटलें! हेंहि कायम टिकेल न टिकेल या आशंकेनें मीं एकदां एक नारळ साईंना अर्पण केला. त्या नारळाच्या दोन्ही बाजूंवर साईनाम ठळकपणें खोदल्यासारखें उमटलें ! आतां हा लेख लिहीत असतां तो पवित्र नारळ माझ्यासमोर टेबलावर आहे व त्यावरील साईनामाक्षरें मला स्पष्ट दिसत आहेत. कांहीं काळपर्यंत जें जें फळ श्रीसाईंपुढें ठेवावें त्या त्या फळावर श्रीनाम उमटत असे. काजूचें फळ नैवेद्यासाटीं ठेवल्यावर वरचें फळ आणि फळाला असलेली काजू बी या दोहोंवर साईनाम उमटे.

एकदां दोन स्त्रीभक्त माझ्या आश्रमांतील पर्णकुटिकेंतून संध्याकाळीं बाहेर पडत असतां एक मोठा साप त्यांच्या पायांवरून गेला. एका स्त्रीनें तर चुकून सापाच्या शेपटीवर पाय दिला. लगेच दोघीजणी मोठ्यानें आर्तस्वरांत ‘ ॐ साई ’ असें ओरडल्या. त्यावर साप उभारलेली फणा खालीं करून तेथून हळूहळू निघून गेला ! मी हा सर्व प्रकार आंतून पहात होतों. त्या स्त्रिया थांबलेल्या मीं पाहिल्या व त्यांचा आर्तध्वनिही मीं ऐकला.

पीठापुरमूचा एक भक्त एके दिवशीं पूजेच्या वेळीं म्हणाला, 'ही सोन्याची आंगठी श्रीसाईंना अर्पण करा; तिच्यावर श्रीसाईनाम उमटलें तर ती श्रीसाईंना मी अर्पण करणार आहें.'

त्याच्या विनंतीप्रमाणें श्रीसाईंना आंगठी अर्पण केली. श्रीसाईंचें नांव तीवर उमटलें. त्यावेळीं त्या भक्तानें आंगठीचे तीस रुपये अर्पण केले व आंगठी ही पूज्यस्मृति म्हणून स्वतःसाठीं ठेवून घेतली. त्यानंतर अनेक भक्तांनीं आपल्या आंगठ्या, गळ्यांतल्या सांखळ्या, रिस्टवॉच इत्यादि वस्तु पूजेंत श्रीसाईंना अर्पण केल्या. त्या सर्वांवर श्रीसाईनाम उमटलें.

भक्तांना देण्यासाठीं पवित्र विभूतिसंचय असावा म्हणून विभूतीचा (उदीचा) एक मोठा गोळा करून श्रीसाईंसमोर पूजेच्या वेळीं ठेवला असतां त्यावरहि साईनाम आपोआप दिसू लागलें.

आश्रमांतील एकजण त्यावेळीं तापानें फणफणत होता. त्याला या विभूतीच्या गोळ्यांतील थोडी विभूति पाण्यांत मिसळून प्यायला दिली. त्याचा ताप लगेच उतरला व थोड्याच वेळांत तो पहिल्यासारखा आश्रमकार्यांत वावरूं लागला.

एकदां आश्रमांतील गाईचें दूध एकदम कडवट झालें. दोन दिवस दुधाचा कडवटपणा कायम राहिला. नंतर गाईच्या अंगाला ही विभूति आम्हीं चोळली. त्यानंतर दूध पूर्ववत् गोड झालें!

पूर्वी आश्रमांत श्रीसाई–पूजा आठवड्यांतून फक्त गुरुवारीं होत असे. पण आतां मात्र दररोज सकाळीं व संध्याकाळीं साईपूजा करण्यांत येते.

* * *


# आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

चष्म्यांचे व्यापारी

मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [ १ ] चामार बाग रोड
परळ, मुंबई १२.

[ २ ] मुकुंद मॅनशन
न. चिं. केळकर रोड,
दादर, मुंबई २८

[ ३ ] १२०–२१ सदाशिव, पुणें २

# वामनपंडित आणि श्रीज्ञानेश्वरी

लेखक : वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

आख्यायिका आणि ऐतिहासिक सत्य यांत जमीन–अस्मानाचें अंतर असतें. पण बहुजन समाजास आख्यायिकाच जास्त आवडतात. याचें कारण त्या ऐकतांना मनोरंजक वाटतात. अशा परिस्थितींत त्या मनोरंजनाचा विरस करून रुक्ष ऐतिहासिक सत्य शोधून काढण्याच्या भरीस लोक पडत नाहींत. रोम शहर जळत असतांना नेरो हा फिडल–वादनांत दंग झाला होता. ही झाली आख्यायिका. हें कांहीं ऐतिहासिक सत्य नाहीं,असें इतिहासज्ञ कंठरवानें सांगत असले तरीसुद्धां लोकांची नेरोबद्दलच्या या आख्यायिकेची गोडी सुटत नाहीं. किंबहुना, खऱ्या इतिहासापेक्षा दंतकथावजा अशा आख्यायिकांचींच लोकांत जास्त चटक असते. मराठी वाङ्मयांत ज्या अनेक आख्यायिका आहेत त्यांत ' यथार्थदीपिकाकार ' वामन पंडित यांनीं श्री ज्ञानेश्वरी आणि श्री ज्ञानेश्वर-महाराज यांच्यावर उडविलेला टीकेचा कडाका केवळ आख्यायिकेच्या रूपानेंच लोकांस परिचित आहे. श्री. मामा वरेरकरांसारख्या प्रसिद्ध साहित्यिकापासून तों इतर लोकांपर्यंत कितीतरी जणांनीं या आख्यायिकेचा आपापल्या समाधानासाठीं उल्लेख केलेला आहे. पण या आख्यायिकेचें खरें स्वरूप लोकांपुढें कोणीही मांडलेलें नाहीं. लोक फक्त वामन पंडितानें श्री ज्ञानेश्वरांची चांगलीच उडविली आहे, या आख्यायिकेवरच खूष. या आख्यायिकेवर वाङ्मयीन दृष्ट्या प्रकाश पाडणें जरूर आहे.

यथार्थदीपिकेंत ९ व्या अध्यायांत वामन पंडितांनीं श्रीज्ञानेश्वर, श्रीमच्छंकराचार्य आणि श्री रामानुजाचार्य यांच्यावर टीका करून जो वाद–वितंडवाद घातला आहे, त्याचें थोडक्यांत पण स्पष्ट स्वरूप वाचकांपुढें मांडून त्या वादाचा, त्यांना परिच[illegible] करून देणें हा या लेखाचा पहिला उद्देश आहे. खरें पाहिलें तर जिज्ञासु, अभ्य[illegible] आणि विद्यार्थी वर्गासाठीं हें काम कोणीतरी यापूर्वींच करायला पाहिजे होतें. ' ज्ञा[illegible]श्वरींतील तौलनिक तत्त्वज्ञान ' या आपल्या प्रबंधांत डॉ. पेंडसे यांनीं ' वामन पं[illegible] व ज्ञानेश्वर ' असें एक प्रकरण लिहिलें आहे. पण त्यावरून सुद्धां ह्या दंतकथाव[illegible] वादाची सुस्पष्ट कल्पना होत नाहीं. या लेखाचा दुसरा उद्देश म्हणजे वाङ्मयीन वा[illegible]तील एक अनुदात्त, अनुदार असूयाप्रेरित व खोडसाळ अशा वादाचें चित्र र[illegible] पुढें मांडणें हा होय. एवढा मोठा वादाचा धुरोळा पंडितांनीं कां उडविला आहे [illegible] वादाचें प्रकरण आहे तरी काय, याचा अल्प परिचय या लेखांत आढळेल.

हें वादग्रस्त केंद्र म्हणजे गीतेंतील ९ व्या अध्यायांतील चौथा, पांचवा व स[illegible] हे श्लोक होत मूळगीतेचे श्लोक असे आहेत:—

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

[ माझ्या अव्यक्त मूर्तीनें हें सर्व जग व्याप्त आहे. सर्व भूतें माझ्यांत स्थित असून मी भूतांत स्थित नाहीं. ]

नच मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

[ आणि तीं भूतेंही माझ्यांत स्थित नाहींत. माझा ऐश्वर्ययोग पहा. मी भूतांचा धारणकर्ता आहे, पण भूतांत स्थित नाहीं. माझा आत्मा हा भूतांचें पोषण व वर्धन करणारा आहे. ]

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

( जसा सर्वत्र फिरणारा महावायु आकाशांत नित्य स्थित आहे, तशीं सर्व भूतें माझ्यांत स्थित आहेत, असा तूं निश्चय कर. )

गीतेंतील वरील तीन श्लोकांवर शंकराचार्य, रामानुजाचार्य, ज्ञानेश्वर आणि वामन पंडीत यांनीं भिन्नभिन्न टीका केलेली असल्यामुळें या चार टीकाकारांनीं आपापल्यापरी कोणत्या भूमिकेवरून टीका केलेली आहे हें कळल्याशिवाय प्रस्तुत वादाचें स्वारस्य कळणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्येकाची भूमिका लक्षांत असणें अवश्य आहे. शंकराचार्यांची भूमिका अद्वैतवादाची, रामानुजांची विशिष्टाद्वैतवादाची आहे. ज्ञानेश्वरांची भूमिका लोकसंग्रहाची आहे; ती त्यांनीं १८ व्या अध्यायांत 'पै आर्तांचेनि वो रसें गीतार्थ ग्रंथन मिसें । वर्षला शांत रसें । तो हा ग्रंथ ॥' या ओवींत सांगितली आहे. याखेरीज मराठी सारस्वत निर्माण करणें या उद्देशाचा देखील या भूमिकेंत समावेश आहे. ही गोष्ट या वादांत जरी गौण वाटत असली तरी ती नजरेसमोर असणें जरूर आहे.

वामन पंडिताची भूमिका अशी आहे कीं, ज्ञानानें निर्गुण ब्रह्म जाणूनहि श्रीकृष्णाच्या चतुर्भुज सगुण मूर्तीची भक्ति करणें हेंच, भागवतांत सांगितल्याप्रमाणें, गीतेचें रहस्य आहे. सकृद्दर्शनीं रामानुज आणि वामन पंडित यांच्या भूमिका सारख्याच असाव्यात अशी वाचकांची अपेक्षा असणें साहजिक आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. रामानुजांच्या टीकेंत भागवताचा निर्देश नाहीं. तर वामनाच्या यथार्थदीपिकेची सारी भिस्त भागवत ग्रंथावर आहे, हें यथार्थदीपिकेच्या वाचकांस जागोजागीं आढळून येतें.

येणेंप्रमाणें शंकराचार्य, रामानुज, ज्ञानेश्वर आणि वामन यांच्या टीका-ग्रंथांच्या भूमिका लक्षांत घेऊन आपण उपरनिर्दिष्ट गीतेंतील ९ व्या अध्यायांतील ४, ५ व ६ या श्लोकांकडे पाहिलें तर ९ व्या अध्यायांतील ४, ५ व ६ या श्लोकरूपी क्रीडांगणा-वरील हा चौरंगी सामना आहे असें कोणाला वाटण्याचा साहजिकच संभव आहे. पण वस्तुतः तशांतला कांहीं प्रकार नाहीं. किंवा भक्तीच्या एकाच बैठकीवर बसलेले रामानुज व वामन पंडित हा एक पक्ष तर शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर यांचें 'भिन्न' पक्ष असा निदान तिरंगी तरी हा सामना असला पाहिजे अशीहि कोणी अपेक्षा केल्यास तें वावगें होणार नाहीं. पण अत्यंत गंमतीची गोष्ट ही कीं, या सामन्यांत

शंकराचार्य, रामानुज आणि ज्ञानेश्वर ह्या तिघांचा एक पक्ष तर विरोधी पक्षांत एकटे वामन पंडित, असा हा दुहेरी सामना आहे. शंकराचार्य हे उघडउघड अद्वैतवादी असल्यामुळें वामनांचा त्यांना कसून विरोध असणें स्वाभाविक आहे. पण ज्ञानेश्वरांनीं वामनांचें एवढें काय घोडें मारलें होतें तर सबंध यथार्थदीपिकाभर त्यांनीं ज्ञानेश्वरांचा वेळोवेळीं 'मंगलाचरणांत क्षुद्र देवतांना वंदन करणारे, सिद्धीच्या जोरावर लोकांना फसवून मोठे टीकाकार म्हणून मिरविणारे' असा उल्लेख कां करावा; याचीं कारणें शोधून काढलीं पाहिजेत. तीं कारणें गीतेंतील ५ व्या अध्यायाच्या १८ व्या श्लोकावरील वामनांच्या टीकेवरून अनुमानानें काढणें सुलभ झालें आहे. 'शुनिश्चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः' या दुसऱ्या चरणावरील त्यांची टीका मोठी गमतीची आहे. शंकराचार्य, रामानुज आणि ज्ञानेश्वर हे एकमतांनीं सांगताहेत कीं, आत्मविद् मनुष्य, ब्राह्मण आणि चांडाळ यांच्यांत एकच आत्मा पहातो आणि या एकात्मक बुद्धीनेंच त्यांच्याशीं सारखेपणानें वागतो. वामन पंडितांना हें सपशेल मान्य नाहीं आणि पसंतही नाहीं. ते जातीचे अस्सल ब्राह्मण, त्यांना हा चांडाळाचा विटाळ मुळींच पसंत नाहीं. म्हणून 'शुनिश्चैव श्वपाकेच' या चरणावरील टीका त्यांनीं आपली जातीयता राखली जावी इतक्या दक्षतेनें केली आहे.

ते म्हणतातः—

जें ब्रह्मत्व पाहती ब्राह्मणीं। तेंचि ब्रह्म दिसे चांडाळपणीं। त्यास बाहेर दुरूनी घालिती पाणी। ब्राह्मण पूजिती नेऊनि घरांत ॥ ६३३ ॥ [1]कास्यधातु [2]गंडूशपात्र। भोजनपात्रही कास्यमात्र। परि त्यांत जेविती अन्नें विचित्र। गंडूषपात्रीं थुंकती ॥ ६३४ ॥ न करिती गंडूषपात्रीं भोजन। आणि ताटांत कोणी न थुंकिती जन। एवं सम पाहणेंचि [3]अपरोक्ष ज्ञान। वर्तणें यथायोग्य ॥ ६३५ ॥

आत्मोपम्य भाव रोमरोमांत भरलेल्या श्री मच्छंकराचार्यादि संतांचें एक मत तर वामनासारख्या जातिवंत ब्राह्मणाचें मत त्याहून कसें भिन्न आहे, ही गोष्ट यावरून सिद्ध होतें. इतकेंच नव्हे तर याच्याच पुढील २१ व्या श्लोकाचा 'बाह्यस्पर्शेष्व सक्तात्मा' मूळगीतेंतील हे सामासिक शब्द. पण ते वामनांच्या जातिवंत ब्राह्मण मनाला खटकल्यामुळें त्यांनीं 'शस्त्रक्रिया यशस्वी' परंतु 'रोग्याचें मरण' या न्यायानें या शब्दाची कशी दुर्दशा उडविली आहे हें ज्याला पहावयाचें असेल त्यांनीं यथार्थदीपिकेंतील ही टीका अवश्य वाचावी!

एवंगुणविशिष्ट वामन पंडितांस श्री ज्ञानेश्वरांचें सारें चरित्र भ्रष्टपणाचें वाटणें स्वाभाविकच आहे. ज्या ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत 'हे कल्पादि भक्ति मियां। भागवत मिसें ब्रह्मेया। उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेशिली ॥ ज्ञानी इयेतें स्वसंवित्ति। शैव म्हणती शक्ति। आम्हीं परम भक्ति। आपुली म्हणों ॥' असा अद्वैत, शैव आणि वैष्णव यांच्या संप्रदायांचा समन्वय केला आहे ती ज्ञानेश्वरी 'यथार्थदीपिकें'त त्यांना पदोपदीं खटकणें हें पंडितांच्या स्वभावधर्मास अनुसरूनच

१) काशाची धातु. २) पिकदाणी. ३) प्रत्यक्षज्ञान.

आहे. ज्या ज्ञानेश्वरांनीं शूद्रादिकांना ब्रह्मविद्येचे अधिकारी करून ब्राम्हणांना लाजविणारे असें खरे ब्राह्मणधर्म ज्यांच्या रोमरोमांत भरले आहेत, अशीं माणसें निर्माण केलीं त्या ज्ञानेश्वरांबद्दल जुन्या वळणाच्या सनातनी वामन पंडितांच्या मनांत राग असणें आणि तो त्यांनीं वेळोवेळीं यथार्थदीपिकेंत अत्यंत खोडसाळपणें प्रदर्शित करणें, यांत कांहीं नवल नाहीं. खरें पाहिलें तर ज्ञानेश्वरी हा ६०० वर्षांपूर्वींचा जुना ग्रंथ, तर 'यथार्थदीपिका' हा त्यानंतर ३०० वर्षांनीं जन्मास आलेला. पण ज्ञानेश्वरीचें तारुण्य, नाविन्य, रमणीयता आणि टवटवी हीं अझून शुक्लेंदूप्रमाणें वाढत्या प्रमाणांत आहे; तर 'यथार्थदीपिका' या ग्रंथास लवकरच म्हातारपण आलें असें म्हणावें लागतें. याचीं कारणें आकुंचितपणा आणि असूयात्मक टीकेंनें बरबटलेल्या 'यथार्थदीपिकें'तच रसिकांस ओतप्रोत भरलेलीं आढळतात.

वामन पंडितांनीं नवव्या अध्यायांतील ४-५-६ ह्या ओव्यांभोंवती घातलेल्या वादाची रूपरेखा वाचकांपुढें स्पष्टपणें असावी म्हणून एवढा हा विस्तार करणें अपरिहार्य होतें. आतां आपण प्रत्यक्ष वाद काय आहे तें पाहूं. अ. ९ यांतील गीतेंतील ४, ५, ६ हे श्लोक व त्यांचा मराठी अनुवाद वर दिलेलाच आहे. शंकराचार्य, रामानुज आणि ज्ञानेश्वर ह्यांनीं प्रत्येक श्लोक स्वतंत्रपणें घेऊन आपापल्या टीका केल्या आहेत. शंकराचार्य आणि रामानुज ह्यांनीं पदप्रपद घेऊन टीका केली आहे; तर ज्ञानेश्वरांनीं उपसंहारांत 'पद-प्रपद पाहून मीं हें ग्रंथन केलें आहे' असें म्हटलें आहे. अर्थात् त्यांनीं प्रत्येक श्लोकावर आपलें स्वतंत्र असें भाष्य केलें आहे. वामन पंडितांची टीका तर पद-प्रपदांचा कीस काढून व ओढाताण करून केलेली आहे, हें मात्र सांगणें जरूर आहे.

४ थ्या श्लोकांत कृष्णानें 'माझ्या अव्यक्त मूर्तीनें हें सर्व व्याप्त आहे. सर्व भूतें माझ्यांत स्थित असून मी भूतांत स्थित नाहीं' असें सांगितलें. ५ व्यांत 'माझा ऐश्वर्ययोग पहा. मी भूतांचा धारणकर्ता आहें. पण भूतांत स्थित नाहीं. माझा आत्मा हा भूतांचा पोषण व वर्धन करणारा आहे.' असें सांगून ६ व्यांत 'सर्वत्र फिरणारा महावायु आकाशांत स्थित आहे तशीं सर्व भूतें माझ्यांत स्थित आहेत, असा तूं निश्चय कर' असें म्हटलें आहे. शंकराचार्य, रामानुज आणि ज्ञानेश्वर ह्यांनीं प्रत्येक श्लोक स्वतंत्रपणें घेऊन आपापली टीका केलेली आहे. ह्या सर्वांनीं ६ व्या श्लोकांतील आकाश आणि वायूचा दृष्टांत ऐश्वर्ययोगाला लागून घेतलेला आहे. पण वामन पंडितांच्या मतें ही चूक आहे. त्यांची इतर टीकाकारांविरुद्ध तक्रार ही कीं, हा ६ व्या श्लोकांतील आकाश-वायूचा दृष्टांत ४ थ्या श्लोकांतील 'मत्स्थानि सर्वभूतानि' या चरणाला लागून योजलेला आहे. त्यांच्या मतें भगवंताला काय वेड लागलें होतें, कीं ज्यांत अधिष्ठान आणि विवर्त असत्य असे सर्परज्जूप्रमाणें दृष्टांत सोडून हा आकाश-वायूचाच दृष्टांत कां घेतला? म्हणून ते म्हणतातः—

अधिष्ठान असे सत्य। विवर्त भासे असत्य। ऐसे कोटि दृष्टांत सोडोनि अगत्य। काय हाच दृष्टांत सर्वज्ञास आठवला ॥ ६५३ ॥ भगवंत म्हणा वेडा। अथवा त्या टीकेची श्रद्धा सोडा। गीता वाचणें, तरी वाचा। गोडगोष्टी ॥ ६५४ गीता

जाते पश्चिमेकडे । टीका चढे पूर्व दिशा पर्वताचे कडे । दोन्हींस हात लाविती बापुडे । अर्थ सांपडे कैंवी तयां ? ॥ ६५५ ॥

वामनांच्या मतें शंकराचार्य, रामानुज आणि ज्ञानेश्वराप्रमाणें टीका जमेस धरल्यास 'आकाश-वायुचा' दृष्टांत एकदेशी ठरतो. दृष्टांत आणि दार्ष्टांत यांस जुळत नाहीं. आकाश व वायु हा दृष्टांत आणि भगवंत व भूतें हा द्राष्टांत होय. म्हणून पंडितांनीं हें दृष्टांताचें कोडें मोठ्या ऐटींत सोडविलें आहे. ते म्हणतात:—

भूतें असोनि नसतीं । हें सिद्ध करितो श्रीपती । या दृष्टांतें भूतें निश्चित असतीं । बळकटी होती या गोष्टीची ॥ ६६० ॥ मी त्यांत नाहीं । तीं मज माजीं नसतीं कांहीं । उडाल्या यो गोष्टी दोनीही । प्रथम गोष्टीस दृष्टांत हा देतां ॥ ६६१

४ था आणि ५ वा हे दोन श्लोक एकत्र घेण्याची क्लृप्ति करून नंतर ६ व्या श्लोकांतील आकाश-वायूच्या दृष्टांतावर चर्वित चवर्ण करून आपली पाठ थोपटून घेऊन वामन म्हणतातः —

उदंड टीकाकार जाले समर्थ । परि या श्लोकांचा अचुंबितार्थ । या 'यथार्थदीपिके'-नेंच प्रकटला यथार्थ । अनन्यशरणगति-प्रतापें ॥ ६७८

यापुढें ज्ञानेश्वरांवर आणि शंकराचार्यांवर किती पोरकट टीका केली आहे ती पहाः —'मंगलाचरणीं क्षुद्र देवता । त्यास कठीण अत्यंत हे गीता' ज्ञानेश्वरांवर या शिवीवजा शब्दाचा प्रयोग किती वेळां केला आहे याची गणतीच नाहीं.

आतां शंकरचार्यांची कशी शोभा केली ती पहा : 'अद्वैताच्या आश्रयें । ब्रह्मचि सर्व देवता या निश्चयें । आम्ही ज्ञानी जगद्गुरु स्वयें । ऐसे मानूनि वर्म चुकलें भक्तीचें ॥ ६७० ॥ ब्रह्म सर्वत्र सम । तरी घरची बटिक काय नव्हे ब्रह्म ? । कां तिचें श्रवण कीर्तन न करावें परम ? । कां मंगलाचरण तिचें करूं नये ॥ ६८१ ॥

ही टीका म्हणजे आचरटपणाची कमालच होय. गीतेवर 'टीका करणारे' उदंड टीकाकार झाले, पण त्यांत आचरटपणा व पोरकटपणाचा जर कोणी विक्रम केला असेल तर एक ह्या 'यथार्थदीपिके'नेंच होय. खरोखर शंकराचार्यांनीं घरची बटिक पाहून सुद्धां तिला ब्रह्म म्हणून वंदन केलें असतें, पण वामनांनीं तिला घरांतून लाथ मारून हांकून देऊन तिच्यांतील ब्रह्माला मनांतल्या मनांत नमस्कार करून ते मोकळे झाले असते; हें ५ व्या अध्यायांतील त्यांच्या 'शुनिश्चैव श्वपाके च' या श्लोकाच्या टीकेवरून सिद्ध झालें. १८ व्या शतकांतील सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता-Erasmus-इरॅस्मस याच्या तत्त्वज्ञानाबद्दल अशी बोलवा आहे कीं, त्याच्या तत्त्वज्ञानांत परमेश्वरासाठीं भव्य असें मंदिर आहे आणि मागल्या बाजूस सैतानासाठीं लहानशी मठीही आहे. वामनांचा आत्मौपम्य धर्म देखील अशाच प्रकारचा दिसतो. फरक इतकाच कीं, पंडितांनीं आपल्या मठीवर 'समदर्शनी' अशी पाटी लाविली असती.

शंकराचार्य व ज्ञानेश्वर हे उघड उघडपणें पंडितांना मान्य नाहींत, पण रामानुजाचार्य तर कट्टे वैष्णव भक्त होते. त्यांच्या टीकेचा तरी त्यांनीं शांतपणें विचार करायला हवा होता. रामानुजांनीं तर ऐश्वर्ययोगाचा दृष्टांत सुगम व्हावा म्हणून 'न घटादीनां जलादेः इव' घटांत जसें पाणी असतें तशी सुद्धां माझ्यांत भूतें नाहींत

असें आपल्या टीकेंत म्हटलें आहे. पण इतर टीकाकारांवर मात करण्याच्या इर्षेनें पेट-लेल्या पंडितांनीं तो दृष्टांत देखील विपर्यस्त केला आहे. (यथार्थदीपिका. अ. ९ ओ. ३४४–५६).

मूळ गीतेंतल्या अनुक्रमाप्रमाणें शंकराचार्य, रामानुज व ज्ञानेश्वर यांनीं खालील-प्रमाणें आपल्या टीकेची मांडणी केली आहे.

| | | |
|---|---|---|
| द्राष्टांत | १ भूतें माझ्यामधें आहेत.<br>२ भूतें माझ्यांत नाहींत.<br>३ मी भूतांत नाहीं. | श्लोक ४ था. इंद्रियप्रतीत सत्य<br>श्लोक ५ वा. ऐश्वर्यभोग–इंद्रियातीत |
| दृष्टांत | ४ आकाश, वायु. | हा दृष्टांत |

वामनांच्या मतें असा भलताच दृष्टांत देण्याला भगवंत कांहीं वेडा नव्हता. म्हणून त्यांनीं २ व ३ ह्या ५ व्या श्लोकांतील विधानांचा संक्षेप करून हें दृष्टांताचें गणित सोडविलें आहे, आणि त्याच्यावर, आपला सर्वज्ञतेचा टेंभा मिरविण्या-साठीं 'ऐश्वर्ययोगावर' पाल्हाळांनीं भरलेलें असें लांबलचक प्रवचन झोडलें आहे. या प्रवचनांत भागवताच्या एकादश स्कंधांतील द्वितीय अध्यायांतील कवि, हरि या ऋषभ कुळांतल्या भक्तांच्या गोड गोष्टी आपल्या समर्थनार्थ घेतल्या आहेत. ऐश्वर्ययोग म्हणजे अघटित घटना, म्हणजेच चमत्कार होय. घटित घटना म्हणजे 'जिची' कारणपरंपरा देतां येते ती, आणि अघटित घटना म्हणजे जिची उपपत्ति लावतां येत नाहीं ती. पण वामन पंडितांना त्यांत कांहींच भेद वाटला नाहीं. ते बोलून-चालून सर्वज्ञ. त्यांना अर्जुनाची प्रतीती माहिती होती तशी भगवंताची प्रतीतीही त्यांना अवगत होती, हें त्यांनीं स्पष्टच केलें आहे. तें असें:—

'धरून तुझी हे प्रतीती। बोलिलों कीं भूतें मजमाजीं असती। मी भूतीं नसे म्हणोनि मागुती। आपल्या (भगवंताच्या) प्रतीतीनें बोलिलों ॥ ३६० ॥ भगवंताला प्रतीती असते आणि त्याची प्रतीती भक्ताला कळते, हा अजब शोध आहे. तसेंच 'पश्य' 'धर्म्यं' 'प्रत्यक्षावगम' या शब्द–प्रबंधांची ओढाताण आपल्या सगुणभक्तीचा सिद्धांत साधण्यासाठीं केली आहे, इतकेंच नव्हे तर ओंवी ६३२ ते ६७० पर्यंत आणि इतरत्रही त्यांनीं 'ऐश्वर' आणि 'योग' यावर पुराण झोडून परमेश्वराच्या निर्गुण आणि सगुण स्वरूपास आपल्या बुद्धीच्या चौकटीत ठाम बसविलें आहे. कांहीं एक शिल्लक ठेविलें नाहीं! यावर शंका अशी कीं, हा भगवंताचा ऐश्वर्ययोग जर इतका सुलभ आहे तर मग वेद आणि श्रुति यांनीं 'नेति नेति' म्हणून त्याचें अमेयत्व आणि अचिंत्यत्व गर्जून सांगितलें त्याची वाट काय? ही आपत्ति शंकराचार्य, रामानुजाचार्य आणि ज्ञानेश्वर महाराज यांनीं आपल्या टीकेंत टाळली आहे. गीता ज्या दिशेनें गेली त्या दिशेनेंच शंकराचार्य, रामानुजाचार्य आणि ज्ञानेश्वरमहाराज गेले. पण वामन पंडित मात्र आपल्या घमेंडींत 'ऐश्वर्य-योगा' चा कडा चढण्यास गेले आणि त्या कड्यावरून त्यांनीं आपल्या पांडित्याचा कडेलोट करून घेतला असेंच कोणताही 'यथार्थदीपिके' चा सूज्ञ व मर्मज्ञ वाचक म्हणेल. या कडेलोटाची तयारी त्यांनीं प्रारंभापासूनच केली होती, हें यथार्थदीपिकेच्या

प्रस्तावांत ' धर्म्यं ' आणि ' प्रत्यक्षावगमं ' या शब्दांच्या ठासून केलेल्या उल्लेखावरून दिसून येतें.

वामन पंडितांनीं श्री ज्ञानेश्वरमहाराजांचा जागोजागी ' मंगलाचरणीं क्षुद्र देवतां '-चें वंदन करणारे असा जो उल्लेख केलेला आहे तो त्यांनीं बुद्धया केलेला खोडसाळपणा आहे, असें कोणीही निःपक्षपाती विद्वान कबूल करील. ज्ञानेश्वरीच्या राजवाडे संहितेंत राजवाड्यांनीं जी प्रस्तावना जोडीली आहे त्या प्रस्तावनेंत ज्ञानेश्वरींतील १ ल्या ओंवीवर तीन पानें विस्तृत टीका केली आहे. राजवाड्यांच्या नजरेस जर वामन पंडितांचा ज्ञानेश्वरासंबंधीं ' मंगलाचरणांत क्षुद्र देवतांचें वंदन करणारे ' असा अभिप्राय आला असता तर राजवाड्यांनीं वामन पंडितांची अतिशहाण्यांतच गणना केली असती. कृष्ण हा परमेश्वराचा ८ वा अवतार. त्याच्या आधीं सात अवतार झाले. त्या अवतारापूर्वीही जो होता त्या परमेश्वराची ' ॐ नमोजी आद्या । वेदप्रति पाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ अशी यथाशास्त्र मंगलाचरणांत ज्ञानेश्वरींत प्रार्थना केली आहे. ही व्यतिरेकात्मक प्रार्थना झाल्यानंतर ' देवा तूंचि गणेशु ' असें रूपकात्मक वर्णन केलें आहे. तें सुद्धां व्यतिरेक-अन्वय न्यायानें शास्त्रशुद्ध आहे. ज्ञानेश्वरीच्या लेखनांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दोन पवित्र संकल्प होते. पहिला ' ये मराठेचिया नगरीं।ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं।' ही धार्मिक क्रांती. दुसरा ' माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । अमृतातेंहि पैजां जींके,' ही भाषिक क्रांती. ज्ञानेश्वरींत २ ऱ्या ओंवीपासून गणेशाचें त्यांनीं जें रूपक वर्णिलें आहे तें मराठी सारस्वताचें पुण्याहवाचन होतें, ही गोष्ट आजही विद्वानांच्या लक्षांत येत नाहीं, तर ३०० वर्षांपूर्वी वामन पंडितांच्या लक्षांत न आली तर त्यांत नवल कसलें ? मराठी ब्रह्मविद्या आणि मराठी भाषा यांच्या द्वारें जर त्यांनीं त्या काळीं संयुक्त महाराष्ट्राचीं बीजें पेरिलीं नसतीं तर मुसलमानी अंमलांत मराठीच्या ऐवजीं वामन पंडितांची 'यथार्थदीपिका' ही फारशी-मिश्रित कन्नड भाषेंत लिहिली गेली असती, असा थोरथोर इतिहासज्ञांचा अभिप्राय आहे. या दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्राचे श्रीज्ञानेश्वर हे प्रपितामह आहेत.

' यथार्थदीपिकेंत ' वामन पंडित असें म्हणतात कीं, जो धर्म भगवंतानें भागवतांत सांगितला तोच धर्म गीतेंत सांगितला आहे. या समजुतीमुळें ठिकठिकाणीं भागवताचे आधार घेऊन त्यांनीं आपला ग्रंथ उगाच फुगविला आहे. पण हा सुद्धां ऐतिहासिक कालविपर्यय आहे. आधीं गीता कीं आधीं भागवत ? गीता अर्जुनाला रणांगणावर सांगितली, तर भागवत हें उद्धवाला प्रयाणकालीं सांगितलें. इतकें करूनही जर त्यांनीं एकनाथमहाराजांच्या भागवताप्रमाणें आपल्यापुढें समन्वयाची दृष्टि ठेवून यथार्थदीपिकेची रचना केली नाहीं,—हें दुर्दैव होय. अशा समन्वयाच्या दृष्टीमुळें एकनाथी भागवतांत अवीट अशी गोडी उत्पन्न झाली आहे. पण वामन पंडितांनीं आपल्या ग्रंथाची प्रस्तावनाच ' परी मी न पीं तें क्षार पाणी । वडिलीं केलें म्हणोनि ' या अहंकारांत केल्यामुळें मराठी भाषेंतील एक लोकोत्तर ग्रंथ आज असून नसल्यासारखा झाला आहे. वामन पंडितांनीं ज्ञानेश्वरादि टीकाकारांबरोबर घातलेल्या वादाची आख्यायिका आणि त्या वादाचा खरा इतिहास हा असा आहे.

---

# पंथराज

## योगाभ्यासाचा राजमार्ग

लेखक : ना. वा. गुणाजी

हृत्स्थले मनः स्वस्थता क्रिया ।

भक्तियोगबोधाश्च निश्चितम् ॥ १० ॥

—श्रीरमण–भगवानकृत उपदेशसार.

हृदयाचे ठिकाणीं मन स्वस्थ करणें हाच कर्ममार्ग, भक्तिमार्ग, योगमार्ग आणि ज्ञानमार्ग होय, असें निश्चितपणें समजावें.

योगश्चित्तवृत्ति निरोधः ।

—श्रीपातंजल–योगसूत्र (२)

पंथराज हा शब्द ज्ञानेश्वरींत सहाव्या अध्यायांत आला आहे. ज्ञानेश्वराच्या मतें, गीतेचा सहावा अध्याय म्हणजे 'तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पार । नानायोगविभवभांडार । उघडलें का' (६–११) असा असून तो सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वी 'अर्जुना, हा अवधारीं पंथराज' (६–१५२) असें म्हणून योगाचें विवरण करण्यास त्यांनीं आरंभ केला आहे.

अर्थ–पंथराज हा शब्द पंथ आणि राज या दोन शब्दांचा मिळून झाला आहे. पंथ म्हणजे वाट किंवा मार्ग. परमार्थाचें साधन करीत असतां ज्या मार्गाचें आम्हीं आक्रमण करितों, म्हणजे जें साधन आचरितों त्याला पंथ म्हणतात; आणि पंथराज म्हटलें म्हणजे श्रेष्ठ साधन. असें श्रेष्ठ साधन कोणतें ? तर तें योग होय.

आतां योग म्हणजे काय हें आपण पाहूं. योग हा शब्द 'युज्' म्हणजे जोडणें या धातूपासून झालेला आहे, आणि त्याचा अर्थ दोन पदार्थांची जोड किंवा मिलाफ करणें, त्यांचा संबंध किंवा ऐक्य घडवून आणणें असा आहे. आणि त्याचा अर्थ पुढें पारमार्थिक ग्रंथांत जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य (जीवशिवैक्य) साधणें, त्यांचें तादात्म्य होणें असा झाला आहे; आणि ज्या उपायांनीं व साधनांनीं हें साध्य होईल त्याला योगशास्त्र असें नांव दिलें आहे.

**योगशास्त्रः**—योगशास्त्राचा विषय हा अर्वाचीन नसून तो फार प्राचीन कालापासून चालत आला आहे. चारही वेदांत, विशेषतः अथर्व–वेदांत याविषयीं माहिती मिळेल. वेदांतांत म्हणजे उपनिषदांत ती मिळतेच. अति प्राचीन उपनिषदांत म्हणजे छांदोग्य, बृहदारण्यक, ऐतरेय, तैत्तिरीय आणि कौशितकी यांत

योग या नांवाखालीं नसली तरी त्याविषयीं माहिती विखुरलेली मिळेल. श्वेताश्वतर उपनिषदांत दुसऱ्या अध्यायांत योगाभ्यासाचीं मूलतत्त्वें आणि तत्त्वज्ञान याविषयीं विवेचन आहे. कठोपनिषदांत तर ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि यांची धारणा–समतोलपणा ( तां योगमितिमन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम्। कठ २–६–१०–११ ) असें वर्णन केलेलें आहे. सर्वोपनिषदांचें सार अशी जी भगवद्गीता ती तर 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्र' अशी आहे; आणि तिचा प्रत्येक अध्याय योगाचा एकेक भाग आहे. भगवद्गीतेच्या कालानंतर श्रीपतंजलमहामुनींनीं या शास्त्रांचा नीट व सशास्त्र अभ्यास करून योगसूत्रें रचिलीं आणि त्यांचें एक दर्शन–योगदर्शन बनविलें. यानंतर या शास्त्राचा अभ्यास चालू राहून हठयोग–प्रदीपिका, घेरंडसंहिता, शिवसंहिता आणि अनेक तंत्रग्रंथ निर्माण होऊन त्यांचें एक निराळेंच 'आगम–शास्त्र' झालें आहे. याप्रमाणें योगशास्त्राचा त्रोटक इतिहास आहे.

**गीतेचा सहावा अध्याय**—'गीतार्थाचें सार। विवेकसिंधूचें पार। आणि योगविभवभांडार।' असें ज्या अध्यायाचें ज्ञानेश्वरांनीं वर्णन केलें आहे, त्याकडे आतां आपण वळूं. या अध्यायांत ध्यानाचा अभ्यास सांगितलेला असल्यामुळें त्याला ध्यानयोग किंवा अभ्यासयोग असें अन्वर्थक नांव गीतेच्या कांहीं प्रतींत दिलेलें आढळतें, तें योग्य आहे. पूर्वीच्या पांच अध्यायांत श्रीकृष्णानें अर्जुनाला सांख्यमताप्रमाणें आत्म्याच्या अमरत्वाचा ( आत्मज्ञानाचा ) उपदेश केला, कर्में फलासक्तिरहित व निष्कामपणें आणि ईश्वरार्पण बुद्धीनें कशीं करावींत याविषयीं कर्मयोगाचा उपदेश केला, सांख्य व योग या मार्गांनीं ब्रह्मनिर्वाण–मोक्ष कसा मिळतो, याचेंहि विवेचन केलें. त्यानंतर या सर्व साधनांचा प्राण किंवा आत्मा, त्यांना दृष्टि देणारा असा अभ्यासयोग या अध्यायांत सांगण्याचा त्यांनीं उपक्रम केला. पहिल्या नऊ श्लोकांत मागील अध्यायांत सांगितलेल्या शिकवणीचा थोडक्यांत उपसंहार केला. योगाच्या अष्टांगांपैकीं पहिलीं दोन अंगें–यम व नियम मागील अध्यायांत कमी अधिक विस्तारानें निरनिराळ्या प्रकारांनीं वर्णिलेलीं आहेत, व या अध्यायांत १६–१७ श्लोकांत त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन आहार–विहार, निद्रा–जागर या पुरतें केलेलें आहे. ११–१४ श्लोकांत आसन कसें घालावें हें थोडक्यांत सांगितलें आहे. प्राणायामाचा निर्देश अ. ४–२९ व अ. ५–२७यांत केल्यामुळें येथ त्याविषयीं कांहीं सांगितलेलें दिसत नाहीं. श्लोक १२ ते २३ यांत योगाचा अभ्यास कसा करावा हें सांगितलें असल्यामुळें हे श्लोक फार महत्त्वाचे आहेत. २४-२६ श्लोकांत प्रत्याहार ( इंद्रियें व मन यांना विषयापासून परावृत्त करणें ) सांगितला आहे. हीं योगाचीं पहिलीं पांच बहिरंगें झालीं. पुढील तीन अंतरंगें— धारणा ( चित्ताची स्थिरता ), ध्यान ( चित्ताची एकाग्रता ) आणि समाधि ( चित्ताची एकाकारता किंवा स्वरूपाकारता ) हीं श्लोक २० ते २३ यांत योग या संज्ञेखालीं थोडक्यांत सांगितलेलीं आहेत. अशा अभ्यासी योग्याचा सर्वभूतीं भगवद्भाव कसा होतो आणि सर्वभूतीं समदृष्टि कशी होते हें २९–३२ श्लोकांत सांगितलें आहे. अध्यायाचे शेवटीं अर्जुनाच्या दोन शंकांचें निवारण करून, तपस्वी, ज्ञानी आणि कर्मी या सर्वांपेक्षां योगी श्रेष्ठ असल्यामुळें

'तूं योगी हो' असा अर्जुनास उपदेश करून हा अध्याय संपविला आहे. येणेंप्रमाणें या अध्यायाची रूपरेखा आहे.— आतां योगाभ्यासाच्या मुख्य श्लोकांचा विचार करूं.

**योगाभ्यास**– प्रथम साधकानें एकान्तवासांत राहिलें पाहिजे, आणि शरीर व मन आंवरून आशा–परिग्रह सोडून सतत योगाभ्यासांत मग्न व्हावें. पवित्र व शुद्ध अशा ठिकाणीं आपलें स्थिर आसन मांडावें. तें फार उंच व फार नीच (खोल) नसावें त्यावर दर्भ, नंतर मृगासन आणि त्यावर शुभ्र वस्त्र घालून, चित्त व इंद्रियें यांचे व्यापार नियमित करून मन एकाग्र करून अंतःकरणाच्या शुद्धीसाठीं आसनावर बसून योगाभ्यास करावा (श्लोक १०-१२).

**आसनावर कसें बसावें?**—शरीर (पाठ), डोकें व मान हीं सम म्हणजे सरळ रेषेंत निश्चल धारण करून, स्थिर होऊन, दिशांकडे म्हणजे सभोंवार न पाहतां नासाग्रीं दृष्टी लावून, मन शांत आणि निर्भय ठेवून, ब्रह्मचर्यव्रतानें राहून, मनाचें संयमन करून, माझे ठायीं (आत्मारामीं) चित्त ठेवून मत्परायण होऊन, योगाभ्यासांत रत (युक्त) असावें (श्लोक १३-१४). यांत 'मच्चित्तो युक्त आसीत मत्परः' हें फार महत्त्वाचें आहे. याप्रमाणें सतत आपला योगाभ्यास चालू ठेवणाऱ्या आणि आपल्या मनाचें नियमन करणाऱ्या योग्याला मोक्षप्रद अशी माझे ठायीं असणारी शांति प्राप्त होते (श्लोक १५). आहार—विहार व निद्रा–जागर याविषयीं मितपणा पाळला पाहिजे. (श्लोक १६–१७). श्लोक १८ यांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, जेव्हां त्याचें आवरलेलें मन आत्म्याच्या ठिकाणीं स्थिर होतें आणि सर्व कामनांविषयीं तो निस्पृह होतो तेव्हां त्याला युक्त म्हणजे योगी म्हणतात. आणि त्याची स्थिति कशी असते हें एका उपमेनें पुढील श्लोकीं सांगितलें आहे, तें असेंः—निवांत जागीं ठेविलेल्या दिव्याप्रमाणें चित्तनियमन केलेल्या आणि योगाभ्यास करणाऱ्या योग्याची स्थिति असते. पुढील चार श्लोकांत (२०–२३) योगाची विस्तृत व्याख्या दिलेली आहे, ती अशीः—जेथें (म्हणजे ज्या स्थितीमध्यें) योगाभ्यासानें नियमन केलेलें योग्याचें मन रमतें, जेथें तो शुद्ध मनानें आत्म्याला पाहून आत्म्यांतच संतुष्ट होतो, जेथें इंद्रियांना अगोचर पणें बुद्धिगम्य असें अत्यंत सुख तो अनुभवतो आणि जेथे तो एकदां स्थिरावला म्हणजे तत्त्वापासून केव्हांही ढळत नाहीं, तसेंच जी स्थिति प्राप्त झाली असतां दुसरा कोणताहि लाभ त्याला अधिक वाटत नाहीं, आणि ज्या स्थितीमध्यें असतां कोणतेंहि मोठें दुःख त्याला चाळवूं शकत नाहीं, त्या दुःखसंबंध नसलेल्या स्थितीला 'योग' हें नांव आहे, आणि ह्या योगाचा प्रसन्न चित्तानें आणि निश्चयानें अभ्यास करावा. आणि याचा थोडासा अधिक खुलासा पुढील दोन श्लोकांत केला आहे तो असाः–संकल्पा (विषयचिंतना) पासून उत्पन्न होणाऱ्या सर्व वासनांचा सर्वस्वीं त्याग करून आणि सर्व इंद्रियांचें मनानेंच चोहोंकडून नियमन करून, धैर्ययुक्त बुद्धीनें हळुहळू शांत होत जावें आणि आत्म्याचे ठिकाणीं मन स्थिर करून दुसऱ्या कशाचेंहि चिंतन करूं नये.

'**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत्**।' हा फार महत्त्वाचा

उपदेश आहे. पण वाटतो तितका तो सोपा नाहीं. म्हणून पुढील श्लोकांत असें सांगितलें आहे कीं, चंचल व अस्थिर मनें जेथें जेथें म्हणजे ज्या ज्या विषयांकडे बाहेर धांवूं लागेल, तेथून तेथून त्याला निग्रहानें आंवरून आणून तें आत्म्याच्या ठायीं स्थिर (आत्मवश) करावें. म्हणजे याप्रकारें अतिशय शांतचित्त, रजोगुणापासून मुक्त, निष्पाप व ब्रह्मभूत झालेल्या योग्याला उत्तम सुख प्राप्त होतें. आणि याप्रमाणें सदा योगाभ्यास करणारा योगी निष्पाप होऊन ब्रह्मानुभवाच्या निरतिशय सुखाचा उपभोग घेतो. (श्लोक२७–२८). अशा अभ्यासी योग्याचा सर्वांभूतीं भगवद्भाव कसा होतो आणि त्यांची सर्वांभूतीं समदृष्टि कशी होते हें श्लोक २९–३१ यांत सांगितलें आहे. आणि ३२ व्या श्लोकांत याचें थोडक्यांत असें वर्णन केलें आहे कीं, आपणाला जसें सुखदुःख तसेंच सर्व जीवमात्रांना, अशा (आत्मोपम्य) दृष्टीनें जो सर्वत्र सारखें पाहूं लागतो तो श्रेष्ठ योगी होय.

यावर अर्जुनानें दोन शंका घेतल्याः–(१) मन हें फार चंचल, बलिष्ठ व दृढ आहे. त्याचा निग्रह करणें हें वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणें अत्यंत कठिण आहे. याला भगवंतांनीं उत्तर दिलें कीं, मन हें फार उचंबळ आणि आंवरण्यास फार कठीण आहे हें खरें, पण अभ्यासानें व वैराग्यानें त्याला जिंकतां येतें आणि आपलें मन ज्यानें ताब्यांत ठेविलें त्यालाच उपायानें आणि प्रयत्नानें योग साध्य होतो. (२) श्रद्धेनें योग्याभ्यास करीत असतां मध्येंच कांहीं कारणामुळें तो बंद पडला तर काय गति होते ? यावर भगवंतांनीं सांगितलें कीं, असा मनुष्य कधींच दुर्गतीला पावत नाहीं, मध्येंच तो मरण पावला तर पुढील जन्मीं दुर्लभ अशा योग्याच्या अगर ब्रह्मवेत्त्याच्या पवित्र कुलांत उत्पन्न होतो आणि पूर्वसंस्कारामुळें त्याचा योगाभ्यास चालू राहून तो सिद्धि मिळवून परमगतीला पोहोंचतो. असें सांगून शेवटीं तपस्वी, ज्ञानी आणि कर्मी या सर्वांपेक्षां योगी श्रेष्ठ असल्यामुळें ‘ तूं योगी हो ’ असा अर्जुनास उपदेश करून हा अध्याय संपविला आहे.

**पातंजलयोगः**—भगवद्गीतेच्या कालानंतर योगसूत्राच्या कालाचा उदय झाला. वेद, वेदान्त (उपनिषदें) आणि भगवद्गीता इत्यादि ग्रंथांमध्यें योगासंबंधीं जीं कांहीं प्रमेयें आणि तत्त्वें इतस्ततः विखुरलेलीं होतीं त्या सर्वांचा नीट अभ्यास करून पंतजलि-महामुनींनीं तीं सर्व सूत्ररूपांत गुंफून त्यांनीं योगशास्त्र किंवा योगदर्शन तयार केलें. सूत्रांची भाषा अतिशय तोटकी पण अर्थपूर्ण असते. आणि ज्या विषयाचीं सूत्रें करणार तो विषय सूत्रकाराला पूर्ण अवगत असावयास पाहिजे. विषयाचें पूर्ण ज्ञान नसलें तर त्यावर सूत्रेंच रचितां येणार नाहींत. योगविषयाचा पूर्ण अभ्यास करून पंतजलींनीं योगसूत्रें रचून योगदर्शन तयार केलें. पंतजलि योगाविषयीं काय म्हणतात तें आपण पाहूं.

प्रथमच दुसऱ्या सूत्रांत त्यांनीं योगाची व्याख्या दिली आहे, ती अशीः–**‘योगश्चित्तवृत्तिनिरोधः’** योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध. पुढें तिसऱ्या सूत्रांत असा निरोध केला असतां काय होतें तें सांगतात– **‘तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।’** तदा म्हणजेः चित्तवृत्तींचा निरोध केल्यावर द्रष्टा म्हणजे आत्मा स्वतःच्या स्वरूपांत अवस्थित होतो (राहतो). आणि तसा निरोध केला नाहीं तर काय प्रकार होतो हें पुढील (चवथ्या) सूत्रांत सांगितलें आहे. **‘वृत्तिसारूप्यमितरत्र’**। (निरोधाव्यतीरिक्त)

इतर अवस्थांमध्यें द्रष्टा चित्तांतील वृत्तींशीं स्वरूपता (तादात्म्य) पावतो. पुढील म्हणजे ५ ते ११ सूत्रांत वृत्ति म्हणजे काय आणि त्याचे प्रकार इत्यादि वर्णन आहे. त्याविषयीं येथें अधिक खुलासा करण्याची जरूरी नाहीं; फक्त वृत्ति म्हणजे काय हें सांगितलें म्हणजे पुरे. वृत्ति म्हणजे आपल्या मनांत किंवा चित्तांत उठणाऱ्या कल्पना, विचार किंवा संकल्प इत्यादि. यांचा सर्वांना परिचय आहेच. आतां मुख्य प्रश्न हाच आहे कीं, त्या वृत्तींचा निरोध कसा करावयाचा? भगवद्गीतेंतील भगवानांच्या उत्तराप्रमाणें पतंजलींनीं १२ व्या सूत्रांत असें सांगितलें आहे कीं, '**अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः**' अभ्यास आणि वैराग्य यांनीं त्या वृत्तींचा-मनाचा निरोध होतो. हा अभ्यास कसा करावा हें गीता ६-२६ येथें सांगितलें आहे तें असें:—

यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ।

**अर्थः**—चंचल आणि अस्थिर मन जेथें जेथें म्हणजे ज्या ज्या विषयांकडे बाहेर धांवूं लागेल, तेथून तेथून त्याला निग्रहानें आंवरून आणून तें आत्म्याच्या ठायीं स्थिर (आत्मवश) करावें.

या विषयीं ज्ञानेश्वरांनीं असें सांगितलें आहे कीं, 'कां जें यया मनाचें एक निकें। जे देखिले गोडीचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जाईजे (६-२४०). दुसरें महत्त्वाचें साधन म्हणजे वैराग्य. वैराग्य म्हणजे विषयाचा मनापासून कंटाळा, अरुचि किंवा अनासक्ति. ही नसली तर नानातऱ्हेचे विषय मनांत उमटून येऊं लागतात आणि त्यांचा निरोध करणें फार कठीण जातें; म्हणून वैराग्यहि संपादन केलें पाहिजे.

मनाच्या संयमनाचा विचार करतांना इंद्रियांचाहि परामर्श घेतला पाहिजे. पंच कर्मेंद्रियें आणि पंच ज्ञानेंद्रियें मिळून हीं दहा आणि मन हें अकरावें असा हा अकरांचा संच आहे. याविषयीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं,—

यततोह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ २–६०
तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ २–६१

हे कौंतेया, प्रयत्न करणाऱ्या विद्वानांचेंहि मन हीं उच्छृंखल इंद्रियें बळेंच ओढून नेतात. म्हणून युक्त (योगाभ्यासीं रत) होऊन तीं सर्व इंद्रियें उत्तम प्रकारें आपल्या ताब्यांत ठेवून माझ्याकडेच मन स्थिर करावें. ज्याचीं इंद्रियें वश म्हणजे स्वाधीन झालीं त्याची बुद्धि प्रतिष्ठित (स्थिर) झाली.

या दुर्जन (दुष्ट) इंद्रियांविषयीं ज्ञानेश्वरहि सांगतात कीं, 'पाहे पां आयुष्यातें गढळ करी। जें सरतें जीवित वारी। तया औषधातें वैरी! काय जिव्हा न म्हणे ॥ ६–३६२. ऐसें हितासि जें जें निकें। तें सदाचि या इंद्रियां दुखे। येऱ्हवीं सोपें योगासारिखें। कांहीं आहे ॥ ६-३६३

तेव्हां इंद्रियांसहित मनाचें नियमन (आत्मस्वरूपीं लय किंवा नाश) केलें पाहिजे. म्हणजे 'तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्यचि आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे येणें ॥ (ज्ञानेश्वरी ६-३८६). पतंजलि मुनींच्या सूत्राच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'तदा द्रष्टुःस्वरूपे अवस्थानम्' तेव्हां द्रष्टा (आत्मा) हा आपल्या स्वरूपांत राहतो. हेंच आत्मज्ञान, हाच आत्मसाक्षात्कार.

**अर्वाचीन योगशास्त्रः**-प्राचीन योगशास्त्राचें स्थूल मानानें विवेचन वर दिलेलें आहे. आतां अर्वाचीन योगशास्त्राचेंहि विवेचन थोडक्यांत करूं. पतंजलिमुनींच्या कालानंतर अनेक योगपंथ निघाले आणि त्यांचे अनेक ग्रंथहि निर्माण झाले. या सर्व ग्रंथांना मिळून आगमशास्त्र असें नांव आहे. या शास्त्रांमध्यें तीन मुख्य भाग आहेतः (१) वैष्णव, (२) शैव आणि (३) शाक्त. पूज्य किंवा उपासक देवतेवरून हीं नांवें आलेलीं आहेत. पहिल्या भागांतील ग्रंथांना पंचरात्र आगम, दुसऱ्या भागांतील ग्रंथांना शैव आगम किंवा शैव सिद्धान्त, आणि तिसऱ्या भागांतील ग्रंथांना शक्ति आगम किंवा तंत्रें म्हणतात. परमात्मा हा विश्वाची जननी किंवा माता आहे असें मानून शाक्तपंथी देवीच्या नांवानें आणि विग्रहानें त्याची उपासना करितात. या तिसऱ्या भागांत योगावर अनेक ग्रंथ आणि अनेक तंत्रें निर्माण झालीं आहेत. हठयोगप्रदीपिका शिवसंहिता, घेरंडसंहिता, इत्यादि तंत्रग्रंथ तर अनेक आहेत. त्या सर्वांचीं नांवें देण्याचें कारण नाहीं. या अर्वाचीन योगग्रंथांचें व तंत्र-ग्रंथांचें आणि ज्ञानेश्वरीचें धोरण व विवेचन पाहिलें तर हे सर्व ग्रंथ पंथराज सोडून अव्हाटा म्हणजे आडवाटेनें जात आहेत असें दिसतें. उदाहरणार्थ नाड्या, पद्में किंवा चक्रें, कुंडलिनी इत्यादि विषय प्राचीन योगग्रंथांत नाहींत. अर्वाचीन योगग्रंथांत आणि तंत्रग्रंथांत याविषयीं भरपूर विवेचन आहे. त्याचें आपण थोडक्यांत वर्णन करूं. शिवसंहिता अध्याय दोन यांत त्यांचें वर्णन आहे. श्लोक १७ यांत सांगितलें आहे कीं, नाड्या ह्या अधोमुख असून त्या कमलतंतूसारख्या आहेत. कदाचित् नाड्या म्हणजे मज्जातंतू असतील. इडा नाडी ही डाव्या बाजूस असून सुषुम्नेला वळसा घालून ती उजव्या नाकपुडींत येते. पिंगला नाडी उजव्या बाजूस असून ती सुषुम्नेला वळसा घालून डाव्या नाकपुडींत येते. या दोन्हीं नाडयांमध्यें पृष्ठवंशरज्जूमध्यें असलेली नाडी सुषुम्ना होय (श्लोक २५-२७). या सुषुम्ना नाडीमध्यें सहा चक्रें आणि मस्तकांत एक मिळून सात चक्रें आहेत, तीं येणेप्रमाणें—

| नांव | स्थान व देवता | शारीरशास्त्रांतील इंग्रजी नांव |
|---|---|---|
| १ मूलाधार | गुदस्थान | Sacral Plexus |
| (दळें ४) | (गणपति) | |
| २ स्वाधिष्ठान | लिंगस्थान | Prostatic ,, |
| (दळें ६) | (ब्रह्मा) | |
| ३ मणिपुर | नाभि | Epigastric ,, |
| (दळें १०) | (विष्णु) | |

| | | |
|---|---|---|
| ४ अनाहत (दळें १२) | हृदय (रुद्र) | Cardiac Plexus |
| ५ विशुद्ध (दळें १६) | कंठ (ईश्वर) | Laryngeal " Pharyngeal |
| ६ आज्ञा (दळें २२) | भ्रुमध्य (परमहंस) | Cavernous " |
| ७ सहस्रदल | मेंदू (शिव) | Brain |

मूलाधार चक्रामध्यें त्रिकोणयोनीसारखा भाग असून तिच्यामध्यें विद्युल्लताकार परदेवता कुंडलिनी (शक्ति) साडेतीन वेटाळें घालून स्थित आहे (श्लोक २२–२३).

**ज्ञानेश्वराचा अपान-कुंडलिनी योगः**–आतां आपण ज्ञानेश्वरींतील सहाव्या अध्यायांतील योगाकडे वळूं.

'योगासारखें दुसरें सोपें काय आहे' असें जरी ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे तरी त्यांनीं आपला योग बराच बिकट केल्यासारखा दिसतो. कारण त्यांच्या योगाचा अभ्यास केलेले बहुतेक कोणी दिसत नाहींत. ज्ञानेश्वराचे सांप्रदायिक शिष्य आणि भक्त आणि ज्ञानेश्वरीचे अभ्यासी हे ज्ञानेश्वराच्या योगाचा अर्थ नीट समजून सांगत नाहींत. कित्येक तर योगभागाचें भाषांतरहि देत नाहींत; आणि कांहींजण मूळांतील शब्द बहुतेक तसेच ठेवितात. अशा परिस्थितींत आम्हांलाहि त्याचा नीट व सरळ अर्थ देतां येत नाहीं. तेव्हां याविषयीं शक्य तितकी माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे.

ओंवी १५३ पासून हा विषय सुरू झाला आहे. याची **परंपरा** मूळ शंकरापासून सुरू झाली असून तोहि अद्याप या मार्गाचा कापडी (प्रवासी) आहे. या मार्गाचें इतर पंथांहून श्रेष्ठत्व ओंव्या १५५–१६० पर्यंत वर्णिलेलें आहे. मुख्य विषयास सुरुवात १६२ ओंवीपासून होऊन हा विषय ओंवी ३२७–२८ येथें संपला आहे.

आतां याचा **अभ्यासक्रम** कसा आहे हें थोडक्यांत पाहूं. प्रथम **पूर्वतयारी** १८६ ते १८८ ओव्यांत सांगितली आहे. ती अशीः—

'मग तेथें आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि गुरुस्मरण। अनुभविजे॥ जेथें स्मरतेनी आदरें। सबाह्य सात्त्विकें भरे। जंव काठिण्य विरे। अहंभावाचें॥ विषयांचा विसर पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजी॥"

प्रथम साधकानें एक **विशिष्ट स्थान** शोधून काढिलें पाहिजे. तें कसें असावें याचें वर्णन १६३–१८० या ओंव्यांत सांगितलें आहे. तें स्थान संतांनीं वसविलें असावें, वैराग्य वाढेल असें संतोषकारक, मनाला धैर्य देणारें, अभ्यासाला अनुकूल, रम्य, जेथून परत जाणें हें विसरविणारें असें वखंट, अतिचोखट, 'जेथ अधिष्ठान प्रगट डोळां दिसे' असें तें असावें. नंतर 'वरि चोखट मृगसेवडी। माजी धूतवस्त्राची घडी। तळवटी अमोडी। कुशावर। असें आसन फार उंच किंवा नीच नसून तें मध्यभागीं असावें. (१८५) त्यानंतर आपल्या शरीराची ठेवण–**योगासन**–याचें वर्णन १९२ ते

१९९ या ओंव्यांत केलें आहे. तें थोडक्यांत असें कीं, पोटऱ्या मांडी मागें वळवून उजव्या पायाची टांच खालीं व डाव्या पायाची टांच त्याचे वर सहज ठेवावी. उजव्या टांचेनें वृषण आणि गुदस्थान यामधील शिवण रेषा दाबावी. गुदमेंद्रामधील चार बोट जागेपैकीं दीडदीड बोट जागा सोडून एक अंगुल जागा उरेल ती टांचेच्या वरच्या भागानें दाबावी. दोनी पायांचे घोटे जवळजवळ व सरळ ठेवून त्यांवर सर्व शरीर सांवरून धरावें. ह्या आसनाला किंवा मुद्रेला मूल-बंधासन किंवा वज्रासन म्हणतात.

आतां पुढची पायरी म्हणजे प्राणायामाची असें कोणासहि वाटेल. पण ज्ञानेश्वराच्या योगांत प्राणायामाचा पत्ता नाहीं. त्यांत **अपानायाम** आहे. वज्रासनानें अपानवायु आंतल्या आंत राहून तो वरच्या भागीं जाऊं लागतो. नंतर डाव्या पायावर दोन्ही कर-संपुटें ( हात ) द्रोणाकार ठेवावीं. तेव्हां शिरकमल स्थिर व आंत गेल्याप्रमाणें वाटतें, डोळ्याच्या पापण्या मिटूं लागतात. ती अर्धोन्मीलित दृष्टि नासाग्रपटीं जाते व तेथेंच थांबते. आजूबाजूचें पाहणेंहि बंद होतें. शिरकमल आंत गेल्यामुळें कंठमणि दिसेनासा होतो. या मुद्रेला जालंधर बंध असें म्हणतात. नाभि फुगून ( पोखे ) पोट सपाट झाले ( थोके ) आणि हृदयभाग आंत विस्तार पावला म्हणजे त्या स्थितीला किंवा मुद्रेला वोढियाण ( उड्डीयान ) बंध म्हणतात. या बंधांच्या योगानें आंतील मनोविचार व कल्पना मावळून जातात. क्षुधा, निद्रा इत्यादिकांचें स्मरणहि राहत नाहीं. मूलबंधानें कोंडलेला अपानवायु फुगून पोटांत गुरगुर करूं लागतो; आणि मणिपूर चक्रांत राहून झुंजूं लागतो. त्यामुळें बाळपणापासून सांचलेली पोटांतील घाण बाहेर पडते, कफ-पित्ताचें निर्मूलन होतें. मेद मज्जा सर्व बाहेर पडून नाडीशुद्धि होते. दुसरीकडे आसनाच्या उबाऱ्यानें कुंडलिनी जागृत होते.

**कुंडलिनी योगः**—ओवी २२२ पासून कुंडलिनीचें वर्णन सुरू आहे. कुंडलिनी हें बडें प्रकरण आहे. त्याचा थोडासा विचार करूं. कुंडलिनीचा उल्लेख मुख्य दशो-पनिषदांत नाहीं, भगवद्गीतेंत नाहीं, पातंजल—योगसूत्रांत नाहीं. शिवसंहिता आणि तंत्र-शास्त्राचें ग्रंथ यांमध्यें तिचा उल्लेख आहे. कुंडलिनी—योग तंत्रमार्गाचा—शक्तीच्या उपा-सनेचा विशेष भाग आहे. कुंडलिनी जागृत करून जो मार्ग ( षट्चक्रें ) आक्रमण केला जातो, तो पंथराज असें शाक्तपंथी व नाथपंथी म्हणतात. मुंबईचे डॉ. वसंत जी. रेळे यांनीं 'The Mysterious Kundalini' नांवाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत ते कुंडलिनी म्हणजे Right Vagus Nerve असें म्हणतात. या ग्रंथाचे प्रस्तावनालेखक शाक्ततंत्रविशारद सर जॉन वुडराफ आपल्या प्रस्तावनेंत असें म्हणतात कीं, कुंडलिनी म्हणजे Right Vagus Nerve नव्हे, तर ती एकप्रकारची स्थूल शक्ति ( Gross form of Energy ) आहे. कुंडलिनी मार्गाचे पुरस्कर्ते म्हणतात कीं, ब्रह्मांडाला आधारभूत असणारी शक्ति (Energy) मानवी शरीरांत आहे तिला कुंडलिनी किंवा जीवाची प्राणशक्ति म्हणतात. शक्ति म्हटली म्हणजे तिला रूप कसें असणार ? तेव्हा '**नागिणीचें पिलें । कुंकुमें न्हालें** इत्यादि ज्ञानेश्वरींतील वर्णन

काव्यमय व रूपकात्मकच दिसतें. अर्वाचीन वैद्यशास्त्रानें शरीरांतील सर्व अंतरंगांचा अत्यंत चिकित्सापूर्वक शोध केला आहे. त्या आधुनिक शास्त्रकारांना कुंडलिनी आणि तिच्या मार्गांतील षट्चक्रें यांचा पत्ता लागला नाहीं. ही कुंडलिनी जगदंबा, सर्वांच्या शरीरांत गुदस्थानाजवळील आधारचक्रासन्निध सुप्त स्थितींत असते. तिला जागृत करून स्वकार्यास–षट्चक्रें भेदून सहस्रदलांत पोंचण्यास उद्युक्त करणें हाच योगाचा मुख्य भाग आहे. आसन, मुद्रा आणि बंध इत्यादि सर्व यासाठींच आहेत. सुषुम्ना नाडींत निद्रितावस्थेंत असलेली ती कुंडलिनी वज्रासनानें चिमटली जाऊन जागी होते आणि त्या सुषुम्नेंतून षट्चक्रांचा भेद करीत वरवर जात अखेर मस्तकांतील सहस्रदलचक्रांत जाते आणि तेथें असलेल्या परमात्मालिंगास शक्तिरूपानें मिठी मारते. पृथ्वी, आप, तेज या तीन तत्त्वांचा फन्ना पाडून ती जेव्हां वायुरूप होते, तेव्हां तिला 'मारुती' असें दुसरें नांव प्राप्त होतें. नांव बदललें तरी तिच्या शक्तिपणास केव्हांही बाध येत नाहीं.

**कुंडलिनीच्या प्रवासाचें वर्णनः**—सुषुम्ना हा कुंडलिनी वर जाण्याचा मार्ग आहे. या मार्गावर निरनिराळीं स्टेशनें–चक्रें आहेत. पाहिल्या मूलाधार–चक्रापासून प्रवास सुरू होऊन तो स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा या सहा चक्रांचा भेद करून शेवटच्या मस्तकांतील सहस्रदलांत संपतो. हा कांहीं फारसा लांबलचक नाहीं. त्या प्रवासांत कुंडलिनी ही शरीरांतील पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पांचहि तत्त्वांस क्रमाक्रमानें एकामागून एक भक्षण करून ती पार निघून जाते आणि महाशून्याच्या डोहांत–चिदाकाशांत शिरते. पंचभूतांचा लय करण्यास बाहेरून तिला कांही साधन आणावें लागत नाहीं. आपाकडून पृथ्वी, तेजाकडून आप आणि पृथ्वी, वायूकडून तेज, पृथ्वी, आप, अशा क्रमानें एका भूतांकडून दुसऱ्या भूतांचा कुंडलिनी फन्ना उडविते. ह्यालाच ज्ञानेश्वर म्हणतात–" पिंडे पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु ॥ ( ६-२९१ ) हा कुंडलिनीचा प्रवास सुरू असतां योग्याच्या शरीरांत कसकसे फेरबदल होतात आणि त्याचें सामर्थ्यहि कसकसें वाढत जातें इत्यादिकांचें वर्णन ज्ञानेश्वरांनी केलें आहे, तें जिज्ञासूंनीं मूळांतच पहावें.

सुषुम्ना आणि षट्चक्रें हीं अर्वाचीन शास्त्रज्ञांना ज्ञात नाहींत. त्यांपैकीं कांहींजणांनीं हीं षट्चक्राचीं स्थानें दिलीं आहेत, त्या जागीं मज्जातंतूंच्या संघांचीं स्थानें ( Plexuses ) आढळतात म्हणून षट्चक्रें हीं मज्जातंतूंचीं संघस्थानें असावींत असा तर्क केला आहे. आणि त्या त्या चक्रांना तीं तीं नांवें देऊन टाकिलीं आहेत. कांहींजणांचें असें मत आहे कीं, हीं षट्चक्रें स्थूल शरीरांत नसून, तीं सूक्ष्मशरीरांत–लिंगदेहांत आहेत.

याविषयीं ज्ञानदेवाच्या नांवावर प्रसिद्ध झालेल्या 'स्वात्मानुभव' ग्रंथांत पुढील मननीय ओव्या आहेतः—

एक व्यर्थ अव्होटा भरले। षट्चक्रें भेदूं लागले।
देखत देखत नागवले। साधून भूतें ॥ ७१ ॥

काव्यमय व रूपकात्मकच दिसतें. अर्वाचीन वैद्यशास्त्रानें शरीरांतील सर्व अंतरंगांचा अत्यंत चिकित्सापूर्वक शोध केला आहे. त्या आधुनिक शास्त्रकारांना कुंडलिनी आणि तिच्या मार्गांतील षट्चक्रें यांचा पत्ता लागला नाहीं. ही कुंडलिनी जगदंबा, सर्वांच्या शरीरांत गुदस्थानाजवळील आधारचक्रासन्निध सुप्त स्थितींत असते. तिला जागृत करून स्वकार्यास–षट्चक्रें भेदून सहस्रदलांत पोंचण्यास उद्युक्त करणें हाच योगाचा मुख्य भाग आहे. आसन, मुद्रा आणि बंध इत्यादि सर्व यासाठींच आहेत. सुषुम्ना नाडींत निद्रितावस्थेंत असलेली ती कुंडलिनी वज्रासनानें चिमटली जाऊन जागी होते आणि त्या सुषुम्नेंतून षट्चक्रांचा भेद करीत वरवर जात अखेर मस्तकांतील सहस्रदलचक्रांत जाते आणि तेथें असलेल्या परमात्मालिंगास शक्तिरूपानें मिठी मारते. पृथ्वी, आप, तेज या तीन तत्त्वांचा फन्ना पाडून ती जेव्हां वायुरूप होते, तेव्हां तिला 'मारुती' असें दुसरें नांव प्राप्त होतें. नांव बदललें तरी तिच्या शक्तिपणास केव्हांही बाध येत नाहीं.

**कुंडलिनीच्या प्रवासाचें वर्णनः**—सुषुम्ना हा कुंडलिनी वर जाण्याचा मार्ग आहे. या मार्गावर निरनिराळीं स्टेशनें–चक्रें आहेत. पहिल्या मूलाधार–चक्रापासून प्रवास सुरू होऊन तो स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा या सहा चक्रांचा भेद करून शेवटच्या मस्तकांतील सहस्रदलांत संपतो. हा कांहीं फारसा लांबलचक नाहीं. त्या प्रवासांत कुंडलिनी ही शरीरांतील पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पांचहि तत्त्वांस क्रमाक्रमानें एकामागून एक भक्षण करून ती पार निघून जाते आणि महाशून्याच्या डोहांत–चिदाकाशांत शिरते. पंचभूतांचा लय करण्यास बाहेरून तिला कांहीं साधन आणावें लागत नाहीं. आपाकडून पृथ्वी, तेजाकडून आप आणि पृथ्वी, वायूकडून तेज, पृथ्वी, आप, अशा क्रमानें एका भूतांकडून दुसऱ्या भूतांचा कुंडलिनी फन्ना उडविते. ह्यालाच ज्ञानेश्वर म्हणतात–" पिंडे पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतीचा दंशु ॥ ( ६-२९१ ) हा कुंडलिनीचा प्रवास सुरू असतां योग्याच्या शरीरांत कसकसे फेरबदल होतात आणि त्याचें सामर्थ्यहि कसकसें वाढत जातें इत्यादिकांचें वर्णन ज्ञानेश्वरांनी केलें आहे, तें जिज्ञासूंनीं मूळांतच पहावें.

सुषुम्ना आणि षट्चक्रें हीं अर्वाचीन शास्त्रज्ञांना ज्ञात नाहींत. त्यांपैकीं कांहीं-जणांनीं हीं षट्चक्रांचीं स्थानें दिलीं आहेत, त्या जागीं मज्जातंतूंच्या संघांचीं स्थानें ( Plexuses ) आढळतात म्हणून षट्चक्रें हीं मज्जातंतूंचीं संघस्थानें असावींत असा तर्क केला आहे. आणि त्या त्या चक्रांना तीं तीं नांवें देऊन टाकिलीं आहेत. कांहीं-जणांचें असें मत आहे कीं, हीं षट्चक्रें स्थूल शरीरांत नसून, तीं सूक्ष्मशरीरांत–लिंग-देहांत आहेत.

याविषयीं ज्ञानदेवाच्या नांवावर प्रसिद्ध झालेल्या 'स्वात्मानुभव' ग्रंथांत पुढील मननीय ओव्या आहेतः—

एक व्यर्थ अव्होटा भरले । षट्चक्रें भेदूं लागले ।
देखत देखत नागवले । साधून भूतें ॥ ७१ ॥

अशा आत्मभावानें-स्फुरणानें नृत्य करितोस; याकरितां तुला 'हृदय' असें अन्वर्थक नाम आहे. तसेंच आपल्या संद्दर्शनांतील पहिल्या मंगल श्लोकांत 'हृदि एषः। हृदालयः। हृदयांतील सद्वस्तूला हृत् असें म्हणतात. ही सद्वस्तुच आत्मा होय.

मन स्वस्थ ( वश ) करण्याचा मार्गहि ते सांगतात—

वायुरोधनाल्लीयते मनः
जालपक्षिवद्रोधसाधनम् ॥ ११ ॥

वायूचें रोधन ( प्राणायाम ) केल्यानें जाळ्यांत सांपडलेल्या पक्ष्याप्रमाणें मनाचा लय होतो; म्हणजे मन निश्चल होतें.

प्राणबंधनाल्लीनमासम् ।
एकचिंतनान्नशमेत्यदः ॥ १३ ॥

प्राणाच्या नियमनानें लीन झालेलें मन एकमेवाद्वितीयाच्या चिंतनानें लीन होतें.

वृत्तयस्त्वहं वृत्तिमाश्रिताः ।
वृत्तयो मनो विद्ध्यहं मनः ॥ १८ ॥

सर्व वृत्ति ( विचार किंवा कल्पना ) एका अहंवृत्तीवर अवलंबून आहेत. वृत्ति हेंच मन आणि मन म्हणजे अहंकार.

अहमयं कुतो भवति चिन्वतः ।
अयि पतत्यहं निजविचारणम् ॥ १९ ॥

हा अहं (मी) कोठून येतो याचा शोध करितां करितां, बाबांनो, तो गळून पडतो. आत्मविचार तो हाच.

'हा विचारूनि अहंकार सांडिजे । मग असतीच वस्तु होईजे '॥
—ज्ञानेश्वरी ६-७१

'तेवींच अहंभाव जाये । तरी ऐक्य तें आधींच आहे '॥
—ज्ञानेश्वरी ८-४५

याशिवाय श्रीरमणभगवानांच्या इतर ग्रंथांत मनोनिग्रहाचे उपाय सांगितले आहेत. ते जिज्ञासूंनीं मुळांतच पहावे अशी विनंति करून हें आटपतों.

## ––यंदा शिरडी येथील पुण्यतिथिमहोत्सवांत––

# बाबांच्या पूर्णाकृति प्रतिमेची प्राणप्रतिष्ठा

लेखक––**श्रीसाईपदनत बाबांच्या बाळाचें बाळ**

दोन वर्षांपूर्वी श्रीसाईबाबांनीं पुण्यतिथिप्रसंगीं आपल्या कृपाशीर्वादानें समाधि-मंदिरावर, आपल्या भक्तांकडून, शिरडी–संस्थान–व्यवस्थापक समितीमार्फत सोन्याचा कळस बसवून घेतला; त्या गोड प्रसंगाचें वर्णन मागील श्रीसाईलीलेच्या अंकांत येऊन गेलेलें आहे. अशा रीतीनें आपल्या विजयादशमीच्या पुण्यतिथिदिनीं भक्तांच्या आयुष्यांत व मंदिराच्या आयुष्यांत सीमोल्लंघन घडवून आणलें; तसेंच त्यानंतर दोन वर्षांनीं यंदा आपल्या समाधीच्या शेजारीं, आपल्या जीवनाकृतीची संगमरवरी मूर्ति बसवून, सीमोल्लंघनाची आणखी एक पुढें पायरी भक्तांना चढावयास लाविली आहे !

महाराजांची जीवनाकृति मूर्ति बनवावी व तिची स्थापना समाधिमंदिरांत करावी, असें व्यवस्थापक समितीनें ठरविल्यानंतर ख्यातनाम शिल्पकारांकडून अंदाजपत्रकें मागविण्यांत आलीं; व त्यांत श्री. भाऊसाहेब तालीम ह्यांचें अंदाजपत्रक योग्य वाटल्यावरून व त्यांच्या पाठीमागें गुरुभक्तीची गोड जोड आहे असें कळल्यानें, त्यांनाच हें काम सोंपविण्यांत आलें. त्यांनीं पहिल्याप्रथम एक शाडूची मूर्ति तयार केली व ती व्यवस्थापक समितीच्या सदस्यांना दाखविली; व ती पसंत पडल्यानंतर हल्लीं ज्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व स्थापना करण्यांत आली आहे ती घडविली. ही मूर्ति एका व्यवस्थित खोक्यांत घालून व अनुभवी माणसांच्या देखरेखी-खालीं एका मालवाही मोटारमधून मुंबईहून दि. २ आक्टोबरला शिरडीस नेण्यांत आली. ती मोटार खंडोबाच्या देवळापाशीं पोंचल्यानंतर तेथून मिरवणुकीनें व घोषवादनाच्या निनादांत ती मूर्ति समाधिमंदिरांत समाधीच्या शेजारीं ठेवण्यांत आली.

**समारंभाची सिद्धता**

ह्या गोड प्रसंगाकरितां श्री साईसेवेंत मग्न असलेल्या कित्येक भक्तांना व्यवस्थापक समितीतर्फें निमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठे-समयीं विष्णुयाग व्हावा व त्यावेळीं पवमान पंचसूक्ताचें, तिळाचें मुख्यत्वें हवन व्हावें असें ठरविण्यांत आलें होतें. पवमानाच्या अठ्ठे-चाळीस आवृत्त्या म्हणजेच २ लघुविष्णु करावयाचें ठरविण्यांत आलें होतें; व ह्याकरितां मुंबई व ठाणें येथून १२ वेदशास्त्रसंपन्न असे ब्राह्मण घेऊन जाण्याचें निश्चित केलें होतें. स्थापना व प्राणप्रतिष्ठेची ही धार्मिक बाजू समितीनें श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर व प्रस्तुत लेखक यांच्याकडे सोंपविली होती. आचार्य म्हणून

कुर्ल्याच्या सर्वेश्वरमंदिराचे पुजारी वे. शा. सं. माधवराव जोशी व ब्रह्मा म्हणून वे. शा. सं. भालचंद्र श्रीपाद कानिटकर ह्यांची योजना करण्यांत आली होती. त्या दोघांना सहाय्यक म्हणून ठाण्याचे वे. शा. सं. तात्या जोशी, विनायकराव आठल्ये, नारायणराव जोगळेकर व गजाननराव केळकर व मुंबईचे आणखी ६ इतका ब्रह्मवृंद शिरडीस नेण्यांत आला होता. मंगळवारीं द्वारकामाईंत महाराजांच्या बसण्याच्या जागे-शेजारीं एक शास्त्रोक्त कुंड व २ वेदी तयार करवून घेण्यांत आल्या होत्या व सभोंवतालीं दोऱ्या बांधून ती जागा स्वतंत्र, हवनाकरितां राखून ठेवण्यांत आली होती. दुसरे दिवशीं डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर व इतर ब्रह्मवृंद ह्यांना यावयास उशीर झाल्यानें, हवनाच्या कार्यक्रमाला सुरवात उशीरां झाली. ह्या कर्मांचें पुण्याहवाचन डॉ. व सौ. गव्हाणकर ह्यांनीं ठेविलें. पण त्याच्या अगोदर द्वारकामाईंतील महाराजांच्या छायाकृतीपुढें, समाधिमंदिरांतील पादुकांच्या पुढें व गुरुपादुकास्थानापुढें, श्रीगजाननमंदिरांत, श्रीशंकरमंदिरांत व श्री हनुमानमंदिरांत विडा, सुपारी व नारळ श्री. व सौ. नाना राणे, श्री. नागेशराव सावंत, श्री. बाबासाहेब कीर्तिकर, प्रस्तुत लेखक व त्याची सौ. ह्यांनीं घोषनिनादांत ठेवून महाराजांच्या व ग्रामदेवतांच्या आशिर्वादाची याचना केली.

प्रत्यक्ष हवनाच्या कार्यास साधारण दुपारीं २ वाजतां सुरवात करण्यांत आली.

*** * * हवनाला प्रारंभ * * ***

श्रीमहाविष्णूची एक ३ आणे भाराची सुवर्णप्रतिमा व गरुडाची चांदीची प्रतिमा करण्यांत आली होती. एका वेदीवर श्रीमहाविष्णूच्या प्रतिमेची व गरुडाच्या प्रतिमेची स्थापना करण्यांत आली व दुसऱ्या वेदीवर नवग्रहांची स्थापना करण्यांत आली होती. श्रीमहाविष्णूंच्यावर सहस्र तुलसी वाहण्यांत आल्या व सर्व फुलें, हार तुलसी वाहून झाल्यानंतर त्या स्थानीं जो आकार आला होता त्यांत खरोखरच महाविष्णूची प्रतिमा दिसत होती.

सायंकाळीं ४ वाजतां नित्याप्रमाणें श्रीसाईसच्चरित–अध्याय–वाचन झालें व ५ ते ६॥ वाजेपर्यंत संस्थानचे कीर्तनकार ह. भ. प. विठ्ठलराव मराठे यांचें कीर्तन झालें. आख्यान दामाजीचें लावलें होतें. कीर्तनानंतर धूपारती झाली.

७॥–८ चे सुमारास हवन संपलें. त्यानंतर बलिदान झालें व नंतर बऱ्याच भक्त-बंधुभगिनींच्या देखत व सर्व व्यवस्थापक समितीच्या सदस्यांच्या उपस्थितींत पूर्णाहुतीचा कार्यक्रम झाला. हा प्रसंग खरोखरच अपूर्व मनाला आल्हाद देणारा होता. रात्रीचा समय; सगळीकडे विद्युद्दीपन झालें होतें; यज्ञाच्या दोन्ही बाजूला गॅसचे दिवे ठेविले होते; व पूर्णाहुति दिली जात होती; त्याच वेळेला सामगायन व इतर वेदघोष चालू होता. ह्या वेळेला मद्रासचे ऑल इंडिया सांईसमाजाचे एक उपाध्यक्ष श्री. के. राधाकृष्णन् हेही उपस्थित होते. ह्या सर्व मंडळींना यज्ञाचा प्रसाद म्हणून एक एक श्रीफल देण्यांत आलें. संस्थान–समितीतर्फे श्री. नागेशराव सावंत ह्यांनीं श्री. व सौ. गव्हाणकर, लेखक व त्याची सौ. नलिनीबाई ह्यांना प्रत्येकीं ५ रुपये आहेर केला. नंतर सर्व ब्रह्मवृंदाचें जेवण झालें. अशा रीतीनें बुधवार आश्विन शुद्ध ९ चा कार्यक्रम संपला.

गुरुवार आश्विन शुद्ध १० विजयादशमी ह्या दिनीं पहांटेस महाराजांची कांकड आरती झाली; व नेहमींप्रमाणें समाधीला स्नान घालण्यांत आलें व अभिषेकांना सुरवात करण्यांत आली. सकाळीं ७॥ च्या सुमारास मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचें पुण्याहवाचन लेखक व सौ. नलिनीबाई ह्यांनीं ठेवलें. व नंतर मूर्तीला मुद्दाम आणविण्यांत आलेल्या गंगोदकानें, सर्व उपस्थित व्यवस्थापक समितीच्या सदस्यांच्या हस्तें, मंगलस्नान घालण्यांत आलें; नंतर मूर्तीवर लघुरुद्राचा अभिषेक करण्यांत आला. मूर्तीच्या अनावरणाचा समारंभ ख्यातनाम अहमदाबादचे साईभक्त श्रीसांई शरणानंद (पूर्वाश्रमींचे श्री. वामनभाई पटेल, बी. ए., एल्‌एल्. बी., सॉलिसिटर) ह्यांच्या हस्तें झाला. ह्याच वेळीं पुण्याचे प्राध्यापक श्री. अनंतराव आठवले, साकुरीच्या श्रीमती गोदावरीमाता, नगरचे श्री. सहजानंदभारती–कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, मूर्तीचे शिल्पकार श्री. भाऊसाहेब तालीम, श्री. बाजीराव पाटील, श्री. बाबासाहेब कीर्तीकर, श्री. आबासाहेब राणे, श्री. अण्णासाहेब भट, संस्थानचे इंजीनिअर श्री. अण्णासाहेब नगरकर, पूर्वीचे व्यवस्थापक विश्वस्त श्री. वसंतराव गोरक्षकर, श्री. नागेशराव सावंत व श्री. नाना राणे वगैरे हे उपस्थित होते. ह्या वेळचें दुसरें एक वैशिष्ट्य म्हणून असें सांगतां येईल कीं, नंदादीप पिक्चर्स तर्फे श्री. पांडुरंगराव दीक्षित, कुमारसेन समर्थ व मामा साठे ह्यांनीं ह्या अविस्मरणीय प्रसंगाच्या चित्रपटाकरितां छायाकृति घेतल्या.

✤ ✤ ✤
**अविस्मरणीय समारंभ**
✤ ✤ ✤

सुमारें ११ वाजतां समाधिमंदिरांतील सभामंडपांत महाराजांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त एक समारंभ घडवून आणण्यांत आला होता. सुरवातीस श्री. नाना राणे, स. चिटणीस, ह्यांनीं मूर्तिस्थापनेबद्दलची हकीकत सांगितली; व श्रीसांईशरणानंद, ह. भ. प. दासगणूंच्या वतीनें प्रा. अनंतराव आठवले, व मद्रासचे श्री. बी. व्ही. नृसिंहस्वामीजींच्या वतीनें श्री. के. राधाकृष्णन्, श्रीमती गोदावरीमाता, सहजानंदभारती, भाऊसाहेब तालीम ह्या मंडळींचा संस्थान–व्यवस्थापक–समितीतर्फे महाराजांच्या समाधीवरील प्रासादिक वस्त्र देऊन सन्मान केला. हीं वस्त्रें वरील मंडळींना श्री. रामचंद्र पाटील यांच्या हस्तें देण्यांत आलीं. श्री. नाना राणे यांच्या सूचनेवरून लेखकांनीं उपस्थित पाहुण्यांचेबद्दल कृतज्ञताबुद्धि व्यक्त केली.

✤ ✤ ✤
**भिक्षा, कीर्तन मंत्रजागर**
✤ ✤ ✤

ह्यानंतर श्री. नागेशराव सावंत, नाना राणे, आबासाहेब राणे व कांहीं मंडळी भिक्षेकरितां गेली. तिकडे भिक्षा चालू असतांनाच इकडे सभामंडपांत ह. भ. प. प्राध्यापक श्री. अनंतराव आठवले ह्यांचें कीर्तन चालू झालें. श्री. अनंतराव हे ह. भ. प. दासगणूंच्या तालमींत तयार झालेले; व ह्या प्रसंगाला स्वतः ह. भ. प. दासगणूंनीं उपस्थित रहावें म्हणून त्यांना आग्रहाचें निमंत्रण करण्यांत आलें होतें, पण ते कांहीं कारणामुळें येऊं शकले नाहींत, तरी त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, ह्या निमित्तानें श्री. अनंतरावांचें

कीर्तन व्हावें. श्री. अनंतरावांचें कीर्तन नेहमींच हृदयस्पर्शी होतें. आख्यान एकनाथ-महाराजांना त्यांचे गुरु श्री जनार्दनस्वामी ह्यांनीं श्रीदत्तदर्शन घडविलें ह्याबद्दलचें होतें. कीर्तन सांगतांना व ऐकतांना कीर्तनकार व श्रोतृवृंद सारखाच तल्लीन झाला होता. कीर्तन फारच उत्कृष्ट झालें. कीर्तन १।।। वाजतां संपलें व आरतीला सुरवात झाली.

त्याच सुमारास भोजनगृहांत आराधनाविधीस सुरवात करण्यांत आली. ह्या विधिही करण्याचा मान पूर्वपुण्याईनें लेखकालाच लाभला. गेल्या पुण्यतिथीपासून समितीनें ठरविल्याप्रमाणें १६ ब्राह्मण बोलावून उत्सव करण्यांत येत असतो. ह्या खेपेला अनायासें पढिक विद्वान् असे ब्राह्मण आलेले होते. त्यामुळें हाही विधी चांगल्या प्रकारें झाला. स्थानिक ९ व मुंबईहून आलेल्यांपैकीं ७ असे ब्राह्मण घेण्यांत आले होते.

ह्यानंतर सायंकाळीं ५ ते ६।। पर्यंत मुंबईहून आलेल्या ब्रह्मवृंदाकडून समाधी-समोर सुश्राव्य असा मंत्रजागरणाचा कार्यक्रम झाला. थोडा वेळ स्थानिक ब्राह्मणांनीं नंतर मंत्र म्हटले व मुंबईच्या ब्रह्मवृंदाकडून समाप्ति करण्यांत आली. नंतर धूपारति झाली.

उत्सवाच्या तीन दिवसांत पालखी व रथ यांची मिरवणूक रात्रीं काढण्यांत येत असे; ह्या कार्यक्रमांत यंदा विशेष म्हणून असें सांगतां येईल कीं, पालखी व रथ ह्या दोहोंनाहीं स्वतंत्रपणें विद्युद्दीपनानें सजविण्यांत आलें होतें. मिरवणुकींत नेहेमीप्रमाणें पुष्कळ भक्तांनीं प्रेमळपणें भाग घेतला होता.

पुण्यतिथीच्या दिवशीं रात्रीं रिवाजाप्रमाणें समाधिमंदिर सबंध रात्रभर खुलें ठेवण्यांत आलें होतें व कित्येक कलाकार व वादनकार ह्यांनीं आपली हजेरी सद्गुरु-माउलीचे चरणीं रुजू केली.

*** * * सेवेकऱ्यांना वस्त्रदान * * ***

दुसरा दिवस म्हणजे एकादशीचा. ह्या दिवशीं नेहमींप्रमाणें कार्यक्रम झाले. पण ह्या दिवसाचाही एक विशेष म्हणून असा सांगतां येईल कीं, ह्या दिवशीं संध्याकाळीं शिरडी–संस्थान–व्यवस्थापक समितीनें ठरविल्याप्रमाणें संस्थानच्या प्रत्येक नोकरास व सेवेकऱ्यास एक धोतराचें पान व सफेत कपडा, व स्त्रीनोकरांना लुगडें व खण देण्याचा कार्यक्रम सभामंडपांत संध्याकाळीं ७ च्या सुमारास झाला. श्री. नागेशराव सावंत, व्यवस्थापक विश्वस्त, ह्यांच्या हस्तें कापड देण्यांत आलें. धर्मार्थ दवाखान्यांत मनः-पूर्वक काम करणारे व आपल्या गोड स्वभावानें साईभक्तांत व आसपासच्या गांवांमध्यें अत्यंत लोकप्रिय झालेले डॉक्टर रुस्तुमजी, ह्यांना महाराजांच्या अंगावरील एक वस्त्र प्रसाद म्हणून देण्यांत आलें. प्रत्येक नोकराला आवर्जून बोलावण्यांत आलें व सर्वांच्या देखत त्याला कापड देण्यांत आलें. मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या निमित्तानें हें वस्त्रदान करण्यांत आलें.

ह्या दिवशींही रात्रीं कांहीं कलाकारांना सेवा करण्याची इच्छा होती म्हणून शेज-आरती रात्रीं १ वाजतां घेण्यांत आली होती. श्री. बेळगांवकर ह्यांच्या

गायनाचा कार्यक्रम जवळजवळ १॥ तास झाला व तो भक्तांना फारच आवडला. यानंतर धारवाडच्या रहिवासी श्री. सौ. प्रभुदासी निवेदिता यांचें अर्धा तास अत्यंत हृदयस्पर्शी असें प्रवचन झालें. नंतर कांहीं भगिनींनीं भक्तिगीतें म्हटलीं व रा. नाना गुरव ह्यांनीं नाकांतून सनईचे सूर काढून दाखविले. १० मिनिटें श्री. बेळगांवकर यांनीं एक मालकंस रागामधली चीज म्हटली व शेजारतीनंतर कार्यक्रम संपला.

**भक्तांचा गोंधळ !**

शनिवार दि. ९ हा पारण्याचा दिवस. ह्या दिवशीं सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. सदाशिवबुवा पुराणिक आळंदीकर हे अनायासें साथीदारांच्यासह आले व त्यांनीं काल्याचें कीर्तन केलें. हल्लीं भगिनीही काल्याच्या खेळांत हौशीनें भाग घेतात, ही आनंदाची गोष्ट आहे. ह्या खेपेलाही हंडी फोडण्याच्या वेळीं गोंगाट, गोंधळ व गडबड झाली. दरवेळेला अगदीं उच्च स्वरांत सूचना देण्यांत येतात कीं, हंडी फोडण्याच्या वेळीं भक्त बंधु-भगिनींनीं जागा सोडण्याचें कारण नाहीं, प्रसाद एका चादरींत व्यवस्थित घेतला जाऊन तो सर्वांना सारखा वांटला जाईल. तरीही जाहीरपणें विनंती करावीशी वाटते कीं, इतःपर तरी भक्तांनीं हंडी फोडण्याच्या वेळीं अस्वस्थ होण्याचें कारण नाहीं; व त्यांनीं ही सूचना लक्षांत ठेवून वागल्यास व्यवस्थापक समितीला व्यवस्था करण्यास व ठेवण्यास सुकर जाईल.

ह्याच दिवशीं रात्रीं कै. बाबांचें बाळ ह्यानीं रचलेलें ' कावजी पाटील लीला ख्यान ' हें कीर्तन प्रस्तुत लेखकानें अगदीं पहिल्याप्रथम करण्याचा प्रयत्न केला. कीर्तन रात्रीं ९-२० पासून ११ वाजेपर्यंत झालें. व नंतर शेज-आरती होऊन ह्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

अशा रीतीनें ह्या वेळेचा उत्सव, मूर्तिस्थापनेचा व प्राणप्रतिष्ठेचा प्रसंग महाराजांनीं उत्तम रीतीनें साजरा करून घेतला. ह्या खेपेला व्यवस्थापक समितीनें भक्तांच्या राहण्याची गैरसोय होऊं नये म्हणून समाधिमंदिरासमोर दोन प्रशस्त मांडव (११० खोल्या) घातले होते. नवीन चालू असलेली चाळही ( ६० खोल्या ) भक्तांस वापरावयास देण्यांत आली होती.

स्टेट ट्रान्स्पोर्टनें मोटारीची सोय चांगली ठेवली होती. नासिक डिव्हिजन एस. टी. चे मुख्य अधिकारी मेजर शिर्के जातीनें व्यवस्था पहात होते. हल्लींच्या व्यवस्थेंत एक चांगली भर म्हणजे एक गाडी नाशिकहून सकाळीं ६॥ ला निघून १० पर्यंत संगमनेर मार्गें शिर्डीला पोंचते व परत २॥ ला शिर्डीहून निघून ६ वाजतां नाशिक स्टेशनला पोंचते. एका वेळचें हंशील २ रु. ९ आणे आहे.

श्रीसद्गुरुसाईमाउलीनीं आपल्या भक्तांचें व त्यांच्या मुलाबाळांचें सदोदित कल्याण करावें व त्यांच्याकडून आपली सेवा करून घ्यावी अशी त्यांचे दिव्य व पवित्र चरणीं नम्रपणें विनंती करून लेख संपवितों.

---

# ज्ञानेश्वरींतील भक्तिमार्ग

लेखक : ग. ल. रेगे, बी. ए., एस. टी. सी. डी.

महान् भगवद्भक्त, योग्यांचा मुकुटमणि, दया, क्षमा, शांति आणि वैराग्य यांचें एकमेव प्रतीक व मराठी साहित्याचे आद्यप्रवर्तक असे जे सन्तश्रेष्ठ ज्ञानदेवमहाराज यांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर भावार्थदीपिका नांवाची टीका लिहिली. हीच ज्ञानेश्वरी नांवानें सर्वविश्रुत आहे. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका असल्यामुळें अर्थात् ज्ञानेश्वरींत त्या ग्रंथांतील विचारसरणी प्रामुख्यानें दृग्गोचर होणें हें क्रमप्राप्त आहे. भगवद्गीतेंत ईश्वर-प्राप्तीचें साधन म्हणून कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग या तीन योगांचाच मुख्यत्वेंकरून ऊहापोह आला आहे. गीतेंतील अध्यायांना दिलेल्या नांवांत योग शब्दाचा अर्थ प्रकरण किंवा विषय असा आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. योग शब्दाचा शास्त्रीय अथवा पारिभाषिक अर्थ घेतल्यास सांख्ययोग, पुरुषोत्तमयोग इत्यादि सामासिक शब्दांतील योग शब्दाचा अर्थ सुसंगतपणें लागणार नाहीं. गीतेंत प्रतिपादिलेले कर्मयोग, भक्तियोग हेही निराळे योग नसून ते आत्यंतिक सुखाच्या प्राप्तीचें साधन म्हणून निरनिराळे मार्ग दाखविले आहेत. भगवद्गीतेवर आधारलेल्या व ज्ञानेश्वरींत भावार्थरूपानें स्पष्ट केलेल्या या भक्तिमार्गाच्या अंतरंगाचें ओझरतें दर्शन घेण्याचा विचार प्रस्तुत लेखांत योजलेला आहे.

## भागवतधर्माचा उदय व स्वरूप

भागवतधर्माचा उदय उपनिषत्कालापर्यंत नेतां आला तरी त्याचें निश्चित स्वरूप भगवद्गीतेनंतर लिहिलेल्या विष्णुपर महापुराणांवरूनच कळून येतें. विष्णूची पूजा ख्रिस्तपूर्व काळांतही प्रचारांत होती याबद्दल प्रमाणें सांपडसात. सहाव्या शतकांत वातापीच्या चालुक्यवंशीय राजांनीं भागवतपंथ स्वीकारला होता. आरंभीचीं पुराणें शैव किंवा वैष्णवपंथाचा प्रसार करण्याच्या उद्देशानेंच लिहिलीं आहेत. उत्तरकालीन पुराणांत जरी दोन्ही पंथांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे, तरी कांहीं ठिकाणीं पंथीयांच्या मतांचा अतिरेकही झालेला दिसून येतो. पद्मपुराणांत शैवपंथाचे उपदेशक आणि पाशुपतदर्शनाचे अनुयायी हे पाखंडी होत असें प्रत्यक्ष श्रीशंकरा-कडून वदविलें आहे ! भागवतधर्माचें स्पष्ट स्वरूप भागवत पुराणांत पहावयास मिळतें. भागवतपुराण हें अकराव्या शतकांतलें असावें असें डॉ. भांडारकर यांचें मत आहे, तर तें तेराव्या शतकांत लिहिलें असलें पाहिजे असें श्री. पेंडसे यांना वाटतें. भागवत पुराणाप्रमाणें भक्तिमार्गाच्या उत्तरोत्तर पायऱ्या सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता आहेत—विष्णुलोकं स गच्छति । विष्णुना सह मोदते । इत्यादि. पण त्याचें अंतिम उद्दिष्ट सायुज्यता आहे हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

भक्तिमार्गापूर्वी भारतांत सांख्यमताचा प्रभाव फार जोरांत होता. श्वेताश्वतर उपनिषदांत कपिलाचा उल्लेख आहे. ' ऋषि प्रसूतं कपिलं यास्तमग्रे ज्ञानं विभाति ॥ ' सांख्यमताचा आद्यप्रवर्तक कपिल हा तर निरीश्वरवादी होता. ' ज्ञानेन तु कैवल्यम् ' हें त्याचें ब्रीदवाक्य. ईश्वराचें अस्तित्वच त्यांना मान्य नाहीं, मग भक्ति कोणावर करायची ? पण आमचें विष्णुपुराण कपिलाला विष्णूचा अवतार मानतें. बुद्धही विष्णूच्या अवतारांत येतो. विवेक आणि वैराग्य यांच्या साहाय्यानें केवळ ज्ञानामुळें सामान्य माणसाला मोक्षप्राप्ति होणें कठीण आहे हें जाणून, व सांख्यांची बैठक आधारभूत धरून त्याची प्रक्रिया सांगण्यास योगशास्त्राचा अवतार झाला. सांख्यांच्या २५ तत्त्वांत त्यांना सव्विसावें ईश्वरतत्त्व घालावें लागलें. ब्रह्मावगति म्हणजे ब्रह्मसाक्षात्कार हें त्यांचें ध्येय. योगमार्गी ईश्वराचें अस्तित्व मान्य करतात. पण तें संप्रज्ञात समाधि साध्य होण्यापुरतेंच. असंप्रज्ञात समाधीमध्यें कैवल्य हेंच त्यांचें उद्दिष्ट असतें. शंकराचार्यांचा सांख्यांशीं विरोध असला तरी त्यांच्या तत्त्वप्रणालीचें ' ज्ञानेन तु कैवल्यम् ' हेंच प्रधान सूत्र आहे. कर्म व उपासना यांचा उपयोग चित्तशुद्धीपुरता करण्यास हरकत नाहीं असें त्यांचें मत आहे. भगवद्गीतेंत भक्तीच्या निरूपणासाठीं चारपांच अध्याय दिले असले तरी गीतेचा कल अद्वैताकडेच झुकलेला आहे असें स्पष्ट दिसतें. सातव्या अध्यायांत 'वासुदेवः सर्वमिति' असें भगवान् श्रीकृष्ण सांगत असले तरी वासुदेव हा शब्द ' सर्वं खलु इदं ब्रह्म ' या महावाक्यांतील ब्रह्म वाचक आहे. अशा भावनेनें युक्त असा ज्ञानवान् मनुष्य मला येऊन मिळतो असें ते त्याच श्लोकांत सांगतात. गीतेच्या कालापर्यंत वासुदेवभक्तीचा थोडाफार प्रचार झाला असला तरी ज्या ज्या स्थळीं श्रीकृष्ण ' अहं ' असा निर्देश करतात त्या त्या स्थळीं ते अहं हा शब्द आत्मा किंवा ब्रह्म या अर्थीं योजतात हें स्पष्ट आहे. वासुदेवभक्तींत तरी वासुदेव हें परब्रह्माचें प्रतीक मानलें आहे. भक्तिप्रधान भागवत धर्माचें निरूपण विष्णुपुराण व भागवतपुराण यांत विशेषेंकरून आलें आहे. त्यांतल्या त्यांत श्रीकृष्णचरित्राचें साद्यंत वर्णन करणारा भागवताचा दशम स्कंध विशेष लोकप्रिय आहे. भक्तीची परिसीमा गांठणाऱ्या, 'राधेश्याम' या नामघोषानें उपासकांना भक्तिसागरांत डुंबवणाऱ्या, व जिची पूजा–अर्चा आज हजारों देवळांत मनोभावानें मोठ्या वैभवांत होत आहे, त्या राधेचें नांव रासक्रीडेचें रसभरित वर्णन करणाऱ्या या पुराणांत नाहीं हें नवल होय. महाभारत किंवा हरिवंशांतहि तिच्या नांवाचा उल्लेख नाहीं. पुराणांचा रोख समीपता व सरूपतेपेक्षां सायुज्यतेकडे जास्त आहे असें दिसतें.

## भागवत धर्म अद्वैतापासून पूर्णद्वैताकडे

भागवत धर्माला विशिष्टाद्वैतवादाची कलाटणी इसवी सनाच्या बाराव्या शतकानंतर मिळाली. शंकराचार्यांचा मायावाद, गौडपादाचार्यांचा अजातवाद, कपिलांचा सांख्यवाद व पतंजलीचें योगदर्शन हीं सुसूत्र व तर्काधिष्ठित होतीं. भक्तिमार्गीयांच्या तत्त्वप्रणालीस नारदसूत्रें, नारायणीयधर्म, सात्वतधर्म व पुराणें यांचा आधार नव्हता असें नाहीं. पण या

तत्त्वांचा जोरदार पुरस्कार करण्यास इसवी सनाच्या पहिल्या दहाबारा शतकांत तरी कोणी प्रभावी आचार्य पुढें आलेला दिसत नाहीं. रामानुज, मध्वाचार्य, वल्लभाचार्य या वैष्णवसंप्रदायी आचार्यांनीं हें काम केलें. ईश्वर व जीव हे भिन्न आहेत, जीवघटना नित्य आहे, कर्म उपासना व ज्ञान हीं भक्तीचीं साधनें आहेत, पराभक्तीनें शाश्वत आनंदाची प्राप्ति होते पण ईश्वरैक्य कदापि होणार नाहीं, झालें तरी लक्ष्मीपतित्व व जगत्कर्तृत्व हे गुण त्याला कधींही प्राप्त होणार नाहींत, जीव ईश्वरांश असून त्यानें अनंत कालपर्यंत ईश्वरभक्ति करून त्यापासून मिळणारा आनंद उपभोगीतच नित्य राहिलें पाहिजे, अशा तऱ्हेचे सिद्धांत प्रत्येकानें थोड्याफार फरकानें जनतेपुढें मांडिले. ब्रह्म म्हणजेच साकार सगुण हरि, नारायण, विष्णु वा पुरुषोत्तम. भक्तिमार्गानें शंखचक्रपद्मगदाधर पीतांबरधारी विष्णूचें पूजन केल्यास सुख, संपत्ति, आनंद मिळतो; हें जनतेस सहज पटलें. व हा संप्रदाय थोड्याच काळांत दृढमूल झाला.

## ज्ञानेश्वरांची भूमिका

वरील विवेचनावरून ज्ञानदेवपूर्व व ज्ञानदेवकालीन भक्तिपंथाची रूपरेषा वाचकांच्या ध्यानीं येईल. आतां स्वतः ज्ञानेश्वरांची आध्यात्मिक क्षेत्रांत कोणती भूमिका होती याचा विचार करूं. ज्ञानेश्वर नाथपंथी होते. त्यांनीं गहिनीनाथाचे शिष्य निवृत्तिनाथ, त्यांचेच वडील बंधु, यांचेकडून गुरूपदेश घेतला होता. ही सर्व माहिती त्यांनींच आपल्या शब्दांत ज्ञानेश्वरींत दिली आहे.

क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं। नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें॥ तें क्षीरकल्लोळा अंतु। मकरोदरीं गुप्तु। होता तयाचा हातु। पैठें झालें॥ मग समाधि अव्युत्थया। भोगावी वासना यया। ते मुद्रा श्रीगोरक्षराया। दिघली मीनीं॥ तेणें योगाब्जिनी सरोवरु। विषय विध्वंसैकवीरु। तिये पदीं का सर्वेश्वरु। अभिषेकिले॥ मग तिहीं तें शांभव। अद्वयानंदवैभव। संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथा॥ तेणें कलिकलितु भूता। आला देखोनि निरुता। ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दिधली ऐसी॥ ना आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें॥ मग आर्तांचेनि वोरसें। गीतार्थग्रंथन मिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु॥

क्षीरसिंधूच्या तीरावर पार्वतीच्या कानांत श्रीशंकरानीं जें ज्ञान सांगितलें, पण तें केव्हां सांगितलें तें माहित नाहीं, तें ज्ञान क्षीरसमुद्रामध्यें माशाच्या पोटांत जे मत्स्येंद्रनाथ गुप्तरूपानें होते त्यांना प्राप्त झालें. अचल समाधीचा उपभोग घेतां यावा या इच्छेनें मत्स्येंद्रनाथांनीं आपलें ऐश्वर्य गोरक्षनाथांस दिलें. मत्स्येंद्रनाथांनीं योगशास्त्रांत प्रवीण व विषयविध्वंस करण्याविषयीं महाशूर असे जे गोरक्षनाथ त्यांना आपल्या योगैश्वर्याच्या पदावर बसवून राज्याभिषेक केला. शंकरापासून परंपरेनें आलेलें जें अद्वयानंदसुख तें गहिनीनाथ यांनीं गोरक्षनाथांपासून संपूर्ण संपादन करून आपले शिष्य निवृत्तिनाथ यांस सांगितलें. आदिगुरु श्रीशंकरापासून शिष्यपरंपरेनें हें बोधाचें ऐश्वर्य आमचे कुलांत प्राप्त झालें आहे. मग पीडित झालेल्या जनतेला

दुःखापासून सोडवावें या कळकळीनें गीतेचा अर्थ करण्याच्या मिषानें ब्रह्मरसाचा जो वर्षाव केला तो हा ग्रंथ होय.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं वरील ओंव्यांत अध्यात्मशास्त्रांतील आपली भूमिका अगदीं स्पष्ट केली आहे. आदिगुरु श्रीशंकरापासून आलेल्या नाथसंप्रदायाचे ते अनुयायी होते. त्यांना योगशास्त्र पूर्ण अवगत होतें. आणि गुरुपरंपरेनें लाभलेल्या अद्वयानंदसुखाचे ते भोक्ते होते. ते ब्रह्मरसाचे पिपासु होते. निवृत्तिनाथांनीं ब्रह्मरसाचा वर्षाव करावा व ज्ञाननाथांनीं त्याचें पान करावें. हा ब्रह्मरसाचा वर्षाव म्हणजेच ज्ञानेश्वरी. भगवद्गीतेचा भाव विशद करण्याचा तिचा हेतु असल्यामुळें त्यांत ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र मतांना अवसर नाहीं. गीतेंत अनेक शास्त्रांचें मधुर मीलन असून ती षड्दर्शनांच्या शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेली नाहीं. अर्थात् ज्ञानेश्वरीलाहि तिच पद्धति स्वीकारावी लागली आहे. ज्ञानदेवांचीं स्वतंत्र मतें अमृतानुभव या त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांत मिळतील. शिव आणि शक्ति यांच्या मीलनापासून विश्वाची उभारणी झाली आहे, असें ते मानतात. त्यांची परंपरा शिव आणि शक्तीची एकात्मता मानते. त्यांचे मतीं ही शक्ति ज्ञानरूपिणी, विद्यारूपिणी व अज्ञाननिरोधिनी आहे. स्फूर्तिवादाकडे त्यांचा कल आहे.

## ज्ञानेशांची तत्त्वप्रतिपादन करण्याची हातोटी

एखादें तत्त्व प्रतिपादन करण्याची ज्ञानेशांची हातोटी मोठी विलक्षण आहे. त्या तत्त्वाच्या जितक्या बाजू असतील त्यांतील एकेक घेऊन ती ते प्रथम मांडतील. उपमा, दृष्टांतादि अलंकारांच्या साहाय्यानें त्यावरील सिद्धांत ते वाचकांच्या गळीं उतरवतील. व शेवटीं सर्व बाजू विचारांत घेऊन ते त्यावरील आपला महासिद्धांत निश्चितपणें स्पष्ट मांडतील. कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, वर्णाश्रम, शास्त्रानुपालन इत्यादि वरवर विरोधी दिसणाऱ्या मार्गांत एकवाक्यता आणणें हें फार दुर्घट काम आहे. तें ज्ञानेश्वरांनीं मोठ्या कौशल्यानें साधलें आहे. आपली ही पद्धति त्यांनीं ग्रंथाच्या अखेर दिली आहे.

जे ग्रंथाच्या मध्यभागीं । नाना अधिकार प्रसंगीं ॥
निरूपण अवेगीं । सिद्धांतीं केलें ॥
ते महासिद्धांताचा आवांका । सिद्धांत कक्षा अनेका ॥
भिडवूनि आरंभ देखा । संपवितु असे ॥ १८.१२४० ॥

ग्रंथाच्या मध्यंतरीं नाना–अधिकार–प्रसंगानें अनेक सिद्धांत सांगितले आहेत. तरी पूर्वापार प्रसंग मनांत न आणितां गीतेंत अनेक सिद्धांत आहेत असें जर कोणी मानील तर तें चुकीचें होईल. तर ग्रंथांच्या पोटांत असलेल्या अनेक सिद्धांतकक्षा एकमेकांना भिडवून त्यांतून निर्माण झालेला महासिद्धांतच अखेरचा असें मानलें पाहिजे. गीतेचे तसेंच ज्ञानेश्वरीचे पुष्कळ वाचक प्रत्येक अध्यायावर– नव्हे एखाद्या ओंवीवर दिलेला उपसिद्धांत हा ग्रंथाचा अखेरचा निर्णय मानून त्याबद्दल अभिनिवेश धरतात. ज्ञानेश्वर मायावादाचा अंगीकार करीत नाहींत, परंतु गीतेचा भावार्थ सांगतांना ते मायावादाचीं उदाहरणें देतात. अमृतानुभवांत ते 'अज्ञानाचें' खंडन